मुपीकर

जुलै २०१२

# आषाढी एकादशी विशेषांक



# अनुक्रमणिका


१ **संपादकीय** ४

२ **ललित**

माझा विठ्ठल – देव पेडणेकर ७

माऊली – माझ्या नजरेतून – मयुरी कदम ९

चार हाताचा मिशीवाला विठोबा – संभाजी पेडणेकर ११

पालखेड – अश्वमेधाची सुरूवात – सौरभ वैशंपायन १३

चातुर्मास – अनघा बापट १९

पंढरीची वारी – योगेश काटदरे २०

३ **कथा**

जानी दुश्मन – रघु व्यवहारे २४

मेहंदीच्या पानावर.. – डॉ. युवराज पाटील २८

४ **प्रवास**

कैलास मानसरोवर डायरी प्रकरण ३ पूर्व तयारी - श्रीराम पेंडसे ३१

५ **आरोग्य व दिनचर्या**

आरोग्यं धनसंपदा ४ - श्रीराम पेंडसे ३६

दूध व दुग्धजन्य पदार्थ - वैद्य विनायक प वैद्य खडीवाले ३८

६ **कविता**

विठ्ठला... – देव पेडणेकर ४०

आलो शरण तुला – देव पेडणेकर ४०

| | | |
|---|---|---|
| | पांडुरंग माझा........ – देव पेडणेकर | ४१ |
| | तुझीच भक्ती – देव पेडणेकर | ४२ |
| | पंढरीच्या पाटला – निलेश रटाटे | ४३ |
| | पंढरीच्या राणा – नितीन | ४३ |
| | अनाम कविता – कल्पी जोशी | ४४ |
| | सप्तपदी – कल्पी जोशी | ४४ |
| ७ | **पुष्परचना भाग ३** – सरोज जोशी | ४६ |
| ८ | **खाद्यसंस्कृती** | |
| | उपवासाचे बटाटेवडे – सौ. निवेदीता वाळिंबे | ४९ |
| | रताळ्याचे गुलाबजाम – सौ. निवेदिता वाळिंबे | ५० |
| | उपवासाची जिलेबी – सौ. निवेदिता वाळिंबे | ५० |
| | उपवासाचे ढोकळे – सौ. निवेदिता वाळिंबे | ५० |
| | उपवासाची धिरडी – सौ. ज्योती पळसुले | ५१ |
| | वऱ्याच्या तांदळाच्या खांडवीच्या वड्या – सौ. ज्योती पळसुले | ५१ |
| | उपवासाचे सामोसे – सौ. साधना गोखले | ५१ |
| ९ | **फ़ोटोग्राफ़ी** – गौरव देव , दीपक माने | ५३ |
| १० | **संगीत** | |
| | मैफ़ल – श्रीराम पेंडसे | ५८ |
| ११ | **स्मार्ट सवंगडी** – चित्रकला | |
| | आभा दाते, ओजस समुद्र, पार्थ व्यवहारे, विराज माने | ६६ |

# संपादकीय

नमस्कार मुक्तपीठवासियांनो.....

आजपर्यंत निघालेल्या सर्वच अंकांना तुम्ही भरभरून प्रतिसाद देत आहात त्याबद्दल तुमचे मनःपूर्वक आभार. आपल्या अंकात नेहमीच काहीतरी वेगळे द्यायचे अथवा प्रसंगानुरुप त्यात वैविध्य आणायचे आणि तो अंक त्या प्रसंगानुरुप म्हणा अथवा आलेल्या सणवारानुसार विशेषांक तयार करुन आपल्यासमोर सादर करायचा हा प्रयत्न नेहमीच राहील. अन त्यामधे तुम्हा सर्वांची साथ नक्कीच राहील याची खात्री आहेच.
यावेळचा हा अंक आपल्या विठूमाउलींना सादर करताना खुप आनंद होत आहे. हा अंक पूर्णत्वास नेण्यासाठी माउलींबद्दल आपल्या कवितेत अथवा लेखात लिहीताना आपला लेखक/कवी वर्ग अजिबात कंटाळलेला नाहीय हे त्यांच्या कवितेतून अन लेखातूनच दिसतंय. या अंकात आपल्या सदस्यांनी आपल्या शब्दात माउलीबद्दल लिहुन आणि अनिकेत समुद्र, गौरव देव आणि दीपक माने यांची वारीची फ़ोटोग्राफ़ी यामुळे अंकाची शान वाढवलीय हे आवर्जून सांगावसं वाटतय. तसेच या अंकामधे मुखपृष्ठ तसेच ज्या फ़ोटोंना नावे नाहीत असे काही फ़ोटो / चित्रे ही आंतरजालावरुन घेतलेली आहेत याची नोंद घ्यावी...

संपादकीय मधे थोडं माझ्या शब्दात माउलींबद्दल ...

आमच्या सांगलीतुन पंढरपुर तसे जवळ आहे... ऑफ़ीसला येता जाता माउलीचे नाव घेत पायी चाललेले वारकरी पाहिले की हमखार आठवणारे अन आठवतच गुणगुणायला लावणारे हे गीत.....

दिंडी चालली चालली विठ्ठलाच्या दर्शनाला
घुमे गजर हरीनामाचा भक्त नामात रंगला



विठुमाउलीच्या दर्शनासाठी दिंडीतुन पायी चालत चालत अन मुखी हरीनाम घेत अवघा भक्तगण पाहिला की मनी अपार आनंद दाटुन येतो. प्रत्येक वारकऱ्यांच्या गळ्यात तुळशीमाळ, हाती टाळ, मृदुंग अन एकतारी यांच्या सहाय्याने विठठलाचे अन समस्त संतजनांचे नामस्मरण करत आपल्या विठुमाऊलीशी एकरुप होत वारकऱ्यांचा सगळा जथा स्वत्व विसरुन, तहान भुक हरपुन विठोबा रखुमाईचा नामघोष करत माईलीस भेटायचे दर्शन घ्यायचे या एकाच ध्येयाने झपाटुन पुढे पुढे चाललेला असतो. ओढ असते ती चंद्रभागेत स्नान करायची, ओढ असते ती आपल्या विठुमाऊलीला भेटायची अन आपल्या माऊलीला भेटणे यापरते कशातच सुख नाहीय. विठ्ठलाचे सावळे सगुण रुप पाहुन कित्येक मैल चालत आलेले वारकरी काय ही पंढरी आत्मा हा विठ्ठल म्हणत विठ्ठल नामाचा जयघोष करत तल्लीन होऊन जातात.

आपले संतकवी सुद्धा विठठलाचे गुणगान करण्यात मागे नाहीतच. कुणाला माऊलीची पंढरी आपल्या माहेरासमान वाटते तर कुणाला कुणाला आपल्या हाकेसरशी धावुन येणारा विठु आपल्या मातेप्रमाणे भासतो. कुणाला तो आपला आत्मा वाटतो तर कुणाला तो लेकुरवाळा वाटतो. कुणी त्याचे वर्णन जगाची माऊली असे केलेय. कुणाला तो सगुण भासतो तर कुणाला निर्गुण. तर आपले सुख म्हणजेच माऊली असेही कुणाला वाटते.

अशा या माऊलीचे सावळे, सुंदर, विटेवरचे ध्यान पाहुन आम्हालाही आनंद झाला नाही तर नवलच.........
माऊलींच्या कविता-लेखांबरोबरच नेहमीचे क्रमशः लेख आहेतच पण एक कथा अन इतर लेखही आहेत...
आपल्या विठूमाउलीचा वरदहस्त आपल्या सर्वांवर आहेच अन तो कायम तसाच रहावा हीच प्रार्थना....

श्रद्धा सौदीकर

# ललित

# माझा विठ्ठल

""विठ्ठल विठ्ठल गावू विठ्ठल
पाहू विठ्ठल
चालू विठ्ठल ""

महाराष्ट्रातील तमाम,लाखो विठ्ठल भक्तांना आषाढी एकादशी आली कि हेच म्हणावेसे वाटते मग सर्वजन काम बाजूला सारून विठ्ठलमय होतात. विठ्ठलाचा गजर करू लागतात, हातात दिंड्या पताका घेवून, नाचत भान विसरून पंढरीच्या वाटेला लागतात .

आषाढी एकादशी पासून चातुर्मास चालू होतो.,आणि हे चार महिने, विठ्ठल म्हणजेच प्रत्यक्ष श्री विष्णू शेषाच्या शय्येवर निद्रा घेतात आणि ते चार महिन्यांनी कार्तिक शुद्ध एकादशीला उठतात .आषाढी एकादशीला "देवशयनी" एकादशी आणि कार्तिक एकादशीला "प्रबोधिनी" किंवा "देवउठी" एकादशी असे संबोधतात .

विठूरायामुळे मराठी भाषा बहरली, महाराष्ट्राचा झेंडा अटकेपार फडकला,मराठी संस्कृती,नितीमत्ता, जोपासली गेली,महत्वाचे म्हणजे विठूरायामुळे ही संस्कृती,वारकरयांनी जोपासली आणि जगासमोर एक वेगळेच उदाहरण ठेवले ,म्हणूनच महाराष्ट्राचे आराध्य दैवत ..........सर्वांच्या मनात, मुखात आहे ............

***श्री विठ्ठल ....
हरी विठ्ठल
माझा सखा
सर्वांचा कनवाळू ***

"पुंडलिका वरदेव" असे म्हटल्यावर अगदी सहजगत्या" हरी विठ्ठल"असे साऱ्या भाविकांच्या मुखातून बाहेर पडते हे श्री विठ्ठलाच्या भक्ती मुळेच ........ह्याच भक्ती मुळे, ह्याच ओढी मुळे सर्वत्र "विठ्ठल विठ्ठल"नाद घुमत असतो.संतांनी दाखवलेला भक्तीचा मार्ग अजूनही सर्वत्र अवलंबिला जातो,भक्ती मार्गामुळेच तहान भूक विसरून लाखो भाविक पायपीट करून श्री विठ्ठलाच्या दर्शनास निघतात, न थांबता, न थकता अविरत नाचत गात अविरत प्रवास करतात.

विठूच्या भक्तीत तल्लीन झालेले सर्व ज्ञात संत हे आम्हा सर्वांस गुरु रूपाने आहेत, त्यांच्या ओव्या,अभंग, भारुडे,अश्या अनेकविध लिखाणाने मराठी संस्कृती,वान्मय खूपच वरच्या थराला पोचली आहे.

श्री संत ज्ञानदेव,नामदेव,एकनाथ,तुकाराम,मुक्ताई,रामदास,चिदंबरदास,रमावल्लभदास,मुक्तेश्वर,वामन, श्रीधर, निरंजन, रघुनाथ,असे अनेक महान संत कवी आणि पंडित यांनी मराठी वान्मायात मूल्याची कामगिरी केली आहे, त्यांचे विस्मरण कधीच नाही.मराठी संतांनी परमार्थ विचार ओवीतून मांडला तर परमार्थानुभव अभंगातून व्यक्त केला. बहुविध उपमा, दृष्टांत आदि अनेक अलंकाराने नटलेले वैभवांनी भरून, भाव भक्तीने ओथंबून हे मराठी वान्मय सजलेले आहे. याला अनुसरून मग सर्व भाविक आपल्या मुखात हेच वाङ्ग्मय बोलून गावून एकादशीला महत आनंदाने पालख्या दिंड्या काढून विठ्ठलाच्या दर्शनास चालत असतात,



फ़ोटोग्राफ़ी – गौरव देव







फ़ोटोग्राफ़ी – अनिकेत समुद्र

असा हा विठू सर्वांचा सखा ,दाता ,प्रेमळ,कृपाळू हवा हवासा वाटणारा .....
मग सर्व भाविकजन भक्तिरसात चिंब होवून पावसाची,वाऱ्याची कसलीही नैसर्गिक भीती मनात न ठेवता दंग होवून आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरीस प्रयाण करतात,आणि मानव जीवनात येवून धन्य झाल्याचे मान्य करतात. त्यांच्या मुखी मग आपोआप शब्द बाहेर फुलांसारखे फुलतात आणि आसमंत सुगंध मय होवून जातो,.......

""पावुले हळू हळू चाला
  मुखाने विठ्ठल विठ्ठल म्हणा "“

**पुंडलिक वर देव
******हरी विठ्ठल
**********श्री ज्ञानदेव, तुकाराम
*****************पंढरीनाथ महाराज कि जय******************

......देव पेडणेकर(२१/०६/२०१२..१७.२५)

## माऊली माझ्या नजरेतुन


विठूचा गजर !!!

" जय जय राम कृष्ण हरी " , " जय जय राम कृष्ण हरी " , हरिनामाच्या उद्गघोशाने अवघी दुमदुमते पंढरी . . .

विटेवरी उभा . दिसे रखुमाई दिव्य शोभा . असा हा विठू सावळा मजला लागे जिवलगा . त्या पुंडलिकाच्या भेटी साक्षात परब्रह्म आले असताना मातापित्याच्या सेवेत गर्क असलेल्या त्या महान पुत्राने दिलेल्या विटेवर आजतागायत माझा विठूराया कर कटेवरी ठेवून उभा ठाकला आहे . भगवान श्री विष्णूचा अवतार म्हणजे विठ्ठल आणि आम्ही सारे त्याचे वेडे भक्त म्हणजे अर्थात विष्णुदास . . . ब्रह्मानंद म्हणजे काय ते विठूच्या चरणी लागल्यावरच ज्ञात होते . कधी भक्तांवर लेकराप्रमाणे माया करणारा विठू तर कधी भक्तांच्या संकटांत धावत येणारा विठूराया . माझ्या विठूरायाला अहंभाव नाही कि दुजाभाव नाही . म्हणूनच विठूच्या चरणी लागून सर्व आपपरभाव अनंतात विलीन होतो . माझा विठू म्हणजे गरीब लेकराची माय , वासराची गाय . चराचरात सामावलेला माझा विठू . मनात खरी श्रद्धा येऊन कोणीही येवो त्याला विठू आपलेसे करतो . कधी राव पहिला नाही कि कधी रंक पाहिला नाही . केवळ विठूभक्त , विष्णुदास म्हणून अवघा जनसागर एकचि होतो .

विठू माझा लेकुरवाळा असं म्हणतात ते काय उगीच नव्हे . कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी असं म्हणणारे संत सावता माळी , विठू भक्तीला आजन्म वाहणारे श्रीसंत ज्ञानेश्वर , संत नामदेव , संत तुकाराम हे सर्व संत जणू विठोबाचे मानसपुत्रच . कोणाला मातीच्या गोळ्यात विठू दिसतो तर कोणाला झाडपाल्यात . कोणाला गाईवासरांत तर कोणाला वाहत्या झरात . भक्तीद्वारे समाजप्रबोधन हीच खरी ह्या संतांची शिकवण .विठूच्या भक्तीत लीन झालेले भक्त ह्या कीर्तनाच्या सोबत करूनच प्रबोधन मिळवू लागले . नव्या जुन्याची जाण होऊ लागते . योग्य अयोग्य , सत्य असत्य ह्यांमध्ये फरक कळू लागतो . विठू माउलीला आज महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरच्या मनामनांमध्ये पोहोचवण्याचं श्रेय जातं ते ह्या संत परंपरेला . जशी आईची महती ही तिच्या लेकरांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही तसंच विठूचा महिमा हा संतांना उल्लेखल्या शिवाय केवळ अशक्य आहे . देव भावाचा भुकेला . देव नेहमीच आपले कल्याण करतो . पण आपणही एक हात पुढे केला स्वतःची मदत करण्यास तरच देव आपल्याला मदत करतो . असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी असे म्हणून भागत नाही . अशी थोर शिकवण आपल्या संतावळीकडून आपल्याला मिळत आलेली आहे . भक्ती ही

' डोळस ' करण्यात संतांचा सिंहाचा वाटा आहे . काही लोभी , कर्मठ सनातनी आपल्या हव्यासापोटी खुद्द विठूचीही करत असलेली अवहेलना पाहून तो वरचा परमेश्वरही हळहळी . परमेश्वराला त्यांच्या पाशातून सोडवून सामान्य जनांपर्यंत पोहोचवण्याचं थोर काम आपल्या विठूपुत्रांनी केले .



पंढरी . . . म्हणजे विठ्ठभक्तांचं माहेरघर होय. नित्यनेमाने ह्या पवित्र तीर्थक्षेत्रास भेट देणारे अनेकजण तर आहेतच. त्याशिवाय आषाढी कार्तिकीस पंढरीचा महिमा तो काय वर्णावा !!! ही इतकी गर्दी असूनही सर्व कसं नियमाने घडते. हे वारकरी म्हणजे एक मोठ्ठ कुटुंब असल्याचाच आभास होत राहतो. अक्षरश: देशाच्या कानाकोपऱ्यातुन येणारे वारकरी, त्यांचा उत्साह, त्यांची मौज याची देही याची डोळा पाहणे, ते दृश्य म्हणजे काही औरच असते. शेकडो, हजारो किलोमीटर वरून येणारे वारकरी एकत्रच राहतात. एकाच ताटात जेवतात. एकमेकांमध्ये आपला आनंद वाटतात. इथे सानथोर सगळेच एकरूप होतात. बायापुरुषांमध्ये भेद न करता सर्वजण विठूच्या दर्शनाच्या ओढीने चालतच राहतात. आनंदाचे डोही आनंद तरंग असे काहीसे वातावरण बनते विठूनागरीत पाय ठेवताच. चंद्रभागेत स्नान करून सर्व भक्तगण एकमेकांचे पायी पडून वंदन करतात. जगात कुठेही न पाहिली जाणारी ही आत्मीयता, हा अनामिक आदर आणि ह्यालाच म्हणतात सहिष्णुता. ते काही दिवस अगदीच मंतरलेले असतात. विठूनामात धुंद होऊन भक्तजन आपली सर्व दु:खे, पीडा विसरतात. माउलीला सोडून जाताना एखादे मूल आईपासून दूर होताना होते तशीच भावना होते. माझा विठूराया अशाप्रकारे विष्णुदासांना एक नवीन शक्ती देतो त्यांच्या संकटांशी लढण्यासाठी.

बोला पुंडलिका वरदे हऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽरी विठ्ठल !!!! श्री ज्ञानदेव तुकाराम...!!! पंढरीनाथ महाराज की जय......!!!!!

--- मयुरी कदम

# चार हातांचा, मिशीवाला विठोबा!

विठोबा म्हटले की दोन्ही होत कमरेवर ठेवून वीटेवर उभे असलेले सावळे ध्यान डोळ्यापुढे येते. पण या संकल्पनेला छेद देणारी चार हातांची आणि मिशी असलेली विठ्ठलमूर्ती अहमदनगर जिल्ह्यातील टाकळीभान येथे आहे. संशोधकांच्या अभ्यासाचा विषय ठरलेली ही अनोखी विठ्ठलमूर्ती अशा प्रकारची एकमेव मूर्ती असल्याचे सांगितले जाते.

ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरी लिहिली त्या नेवाश्यापासून अवघ्या १२ मैलावर एक छोटेखानी गाव आहे, टाकळीभान नावाचे. या गावात एक साधेसुधे विठ्ठलमंदिर आहे. पण यातील मूर्ती थेट यादवकाळाशी नाते सांगणारी. विठ्ठल या देवतेच्या उगमाचा शोध घेणारी... जगभरातल्या इतर मूर्तीपेक्षा संपूर्णतः वेगळी.

या मूर्तीमध्ये विठ्ठलाची ओळख असणारे दोन हात कमरेवर आहेतच. पण तिला आणखी दोन हात असून त्यातील एका हातात शंख तर दुस-या हातात चक्र आहे. एवढेच नाही तर या विठ्ठलाला मिशाही आहेत. विठ्ठलाचे विष्णूरुपात घडणारे हे दर्शन अन्यत्र कुठेच का होत नाही, हा संशोधनाचा विषय ठरला आहे.

यादवकाळात भानू नावाच्या राजाची टाकळीभान ही राजधानी होती. मुळातच गवळी-धनगरांचा लोकदेव असणारा हा विठ्ठल या यादवकुलीन राजाचे कुलदैवत. या भानू राजाला विठ्ठलाने विष्णूरुपात दर्शन दिले अशी लोककथा मंदिराचे पुजारी राजेंद्र भागवत सांगतात. मंदिरातील पुजेची जबाबदारी असणारी त्यांची ही सातवी पिढी आहे. पण मंदिर त्याच्याही आधीचे असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

अहमदनगरच्या वस्तुसंग्रहालयाचे संचालक असणा-या सुरेश जोशी यांनी या विठ्ठलावर संशोधन केले. ज्येष्ठ संशोधक रा. चिं. ढेरे यांनीही आपल्या पुस्तकात या विठ्ठलमूर्तीचा उल्लेख केलाय. ते म्हणतात, की गवळी-धनगरांचा लोकदेव असणा-या विठ्ठलाला यादवकुळातील राजांनी विष्णु-कृष्णरूप प्राप्त करून दिले. त्यामुळे विठ्ठलस्वरुपाच्या घडणीच्या विचारात टाकळीभानच्या चतुर्भुज मूर्तीचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो.

विठ्ठलाच्या गळ्यात वैजयंती माळ असून जानवेही कोरलेले आहे. कमरेवर मेखला असून तिने दुटांगी धोतर नेसले आहे. विठ्ठलाच्या मुकुटावर शाळुंकेसह शिवलिंग आहे. त्यामुळे शिव-विष्णूच्या समन्वयाच्या प्रक्रियेत ही मूर्ती घडली असल्याचे स्पष्ट होते. पंढरपूरच्या विठ्ठलाप्रमाणे इथे मकरकुंडले नाहीत. तसेच पंढरपूरात जशी रुख्मिणी रुसून लांब राहिली आहे, तशी इथे नाही. इथे ती विठ्ठलाच्या बाजुलाच उभी आहे. या सा-या वैशिष्ट्यांमुळे विठ्ठलाच्या आद्यमूर्तींमध्ये या मूर्तीचा संदर्भ टाळता येत नाही.

सर्वात मुख्य म्हणजे ज्या संतांच्या रचनांनी आपण विठ्ठलाची उपासना करतो त्यातील अनेक संतांनी विठ्ठलाच्या या चतुर्भुज रुपाचे वर्णन केले आहे. त्यामुळे हे चतुर्भूज रूप संताना माहित होते असे म्हणण्यास जागा आहे.

संत ज्ञानेश्वर म्हणतात,
संत भेटी अजि मज ।
तेणे जाला चतुर्भुज ।
दोन्ही भुजा स्थळी सहज ।
दोन्ही सुक्ष्मी वाढल्या ।।

संत नामदेव म्हणतात,
चतुर्भुज विठ्ठल । कै देखोन डोळा ।।
भक्तांचा जिव्हाळा । जीव माझा ।।

संत बंका महाराज म्हणतात ,
कर कटावरी । पाऊले साजरी ।।
शंख चक्र करी । मिरवले ।।

संत तुकाराम म्हणतात,
शंख चक्रांकित भूषणे ।
जडीत मेखला चिद्ररत्नाने ।
पीतांबरी उटी शोभे गोरेपण ।
लोपले तेणे रवितेज ।।

संतांनी वर्णलेल्या या रुपाची विठ्ठलमूर्ती असेल की हे त्यांच्या भावविश्वातील विठ्ठलाचे वर्णन आहे, हे ठामपणे सांगता येत नाही. पण तरीही हा चतुर्भूज विठ्ठल काहीतरी वेगळे सांगत टाकळीभानमध्ये वर्षानुवर्षे उभा आहे एवढे मात्र निश्चित.

पंढरपूर्वकाळात महाराष्ट्र-कर्नाटकात विठ्ठलोपसना सुरू होती. परंतु अशा प्रकारचे चतुर्भूज रूप कुठेही आढळत नाही. मध्य प्रदेशातील भेलसे येथे उदयगिरी लेण्यात अशा प्रकारची एक मूर्ती सापडते. इ.स.४१०-१६ च्या आसपासची ही भेलसे येथील मूर्ती विठ्ठलाशी कसे नाते सांगते हे अद्याप उलगडलेले नाही. पण विठ्ठलाच्या उत्क्रांतीत पंढरपूरचे महात्म्य वाढत गेले आणि हे चतुर्भूज ध्यान लोप पावले असे मत जोशी यांनी व्यक्त केले आहे.

विठ्ठल या दैवताचा उगम अद्यापही सापडलेला नाही. त्याच्या पंढरपूरनिवासाआधी तो कसा उत्क्रांत झाला त्याचा शोध अद्यापही संपलेला नाही. त्यामुळेच विठ्ठलाचा अभ्यास करणारे अनेक देशी-विदेशी संशोधक या मूर्तीचा अभ्यास करताहेत. कदाचित या अभ्यासातून विठ्ठलाच्या या रुपाचे कोडे उलगडू शकेल.

नाम्याची खीर चाखणारा, चोखोबाची गुरे राखणारा, जनाईचे दळणकांडण करणारा आणि कोट्यवधी वारक-यांचे श्रद्धास्थान असलेला विठोबा सर्वत्र दोन हातांच्या मानवी रुपात दर्शन देतो. पण इथेच असा त्याच्या परमेशरुपात का बरं उभा आहे ? याचे संशोधन फक्त विठ्ठलाच्याच नाही तर महाराष्ट्राच्या इतिहासावार प्रकाश टाकेल. कारण शेवटी दगडातला देव त्याला घडवणा-या माणसाची गोष्ट सांगतो, हे विसरता येत नाही.

तो शिलालेख की आणखी काही ?

या मंदिरात ज्ञानेश्वराच्या मूर्तीच्या देव्हा-याच्या उजव्या बाजुच्या भिंतीवर काहीतरी कोरलेले हातांना जाणवते. पण एवढी वर्षे उलटल्यामुळे आणि त्यावर ऑइलपेंटचे थर चढल्यामुळे आता त्यावर काही कोरले असावे असा फक्त संशय येतो. त्यामुळे या शिलाखंडावर रासायनिक प्रक्रिया करून त्यावरील मजकूराचा शोध घेणे ही काळाची गरज आहे. कदाचित विठ्ठल या दैवतासंदर्भातील महत्त्वाचा संदर्भ त्यात सापडू शकेल .

संभाजी उर्फ़ सॅम पेडणेकर

# पालखेड : अश्वमेधाची सुरुवात

जंजिरेकर सिद्दी आणि निजाम - उल - मुल्क हे दक्षिणेतले पापग्रह कायम मराठ्यांच्या पत्रिकेत नीचीचे आणि पीडादायकच राहिले. अगदी स्वातंत्र्यानंतरही काही काळ निजामाचे वंशज राष्ट्राची डोके दुखी ठरले. याची सुरुवात झाली निजाम १७२३ दरम्यान दख्खनमध्ये स्थिर झाल्यावरती. आपला जम बसवल्यावर निजामाने, भोसले घराण्यात असलेली तेढ अजून वाढीस लावली. कोल्हापूरचे संभाजीराजे निजामाच्या कच्छपी लागले. बाजीराव व श्रीपतराव प्रतिनिधी कर्नाटक मोहिमेत गुंतले असताना निजामाची फूस मिळून संभाजीराजे शाहू छत्रपतींच्या प्रदेशावरती चालून आले. स्वतः निजामही कर्नाटकात उतरून अखानीपर्यंत गेला व मराठ्यांना चौथाई-सरदेशमुखी मिळू नये म्हणुन विरोध करु लागला. तुमच्यात खरा वारस कोण? हे नक्कि कळावे म्हणून दोघेही (शाहू छत्रपती व संभाजीराजे) मला हैदराबादेस येऊन भेटा अशी गुर्मी असलेली पत्रेही धाडली. श्रीपतराव प्रतिनिधीने हा प्रस्ताव मान्य करा असे सुचवले, पण बाजीरावांनी ते स्पष्टपणे नाकारले. निजामाचे हेतू किती स्वच्छ आहेत ते शाहु राजांनाही दिसत होतं. संघर्ष होणार हे नक्की होतं फक्त कधी व कुठे हा प्रश्न होता.

अर्थात फार वेळ दवडावा लागला नाही. निजाम स्वतःहून अंगावर आला. १७२७ च्या ऑगस्टमध्ये दोन्ही बाजूंनी हालचाली सुरु झाल्या. १७२७ च्या सुरुवातीला निजाम भीर येथे होता. जून ते सप्टेंबर, त्याने धरुर येथे छावणी टाकली होती. तिथून त्याने औरंगाबादकडे मोर्चा वळवला पण त्याच्या आज्ञेवरुन, मराठ्यांच्या हद्दीत ऐवजखान नाशिक जवळील सिन्नर भागातून उतरला. त्याला तुकोजी पवार सामोरे गेले. खरे तर तुकोजी खाली पुण्याकडे येत असताना ही बिलामत कोसळली. ऐवजखानाला फटकावून त्यांनी औरंगाबादकडे पिटाळले. अजून खाली सरकल्यावर कुमार बहादूर या मुघल रजपूत सरदाराशी त्यांची झडप झाली. कुमार बहादूरला थोरात आणि पार्नेकर असे दोन देशमुख येऊन मिळाले. बाजीरावांनीही तुकोजींच्या मदतीला सैन्याची तुकडी पाठविली.

तोवर दुसरा आघात चंद्रसेन जाधवांनी केला. निजामाशी हातमिळवणी करुन बदामीची जागीर त्यांनी आपल्या पदरात पाडून घेतली होती. कोल्हापूरच्या संभाजीराजांना निजामाच्या गोटात खेचण्यात चंद्रसेन जाधवाचा मोठा हात होता. संकट मोठे होते. अंबाजीपंत पुरंदरे यांनी शाहुंतर्फे एक पत्र बाजीरावांस पाठवले. त्यात म्हंटले होते की मिळालेल्या बातम्यांनुसार निजाम म्हसवडच्या बाजूने साताऱ्यावरती आक्रमण करेल. अश्यावेळी तुम्ही आणि सेनापती खंडेराव दाभाडे हे जवळ असणे शाहू महाराजांना गरजेचे वाटते. खंडेराव दाभाडे यावेळी तळेगावांत होते. बाजीरावाकडून कुठल्याही आज्ञा घ्यायला ते मनापासून तयार नव्हते. कालचं पोरगं आपल्याला युध्दकाळात आज्ञा देणार हे त्यांना मानवत नसावं. त्यांनी बाजीरावास पत्र पाठवून सगळ्यांना सोबत घ्या व पुढील चर्चेसाठी तळेगावला या असेही सांगितले. बाजीरावांनी एक विश्वासू माणूस त्यांकडे पाठवला. झाल्या चर्चेत वेळ तितका गेला, निष्पन्न फारसे झाले नाही. गरज पडेल तेव्हा मी तळेगावाहून कूच करेन, आता मुलगा त्रिंबकराव दाभाडे हा मदतीला येईल इतकेच ठरले.


वेळ फार मोलाचा होता. निसटत चाललेला वेळ युध्दाचे पारडे सहज फिरवू शकतो. त्यातून निजाम कोणी आलतूफालतू सरदार नव्हता. अनेक रणक्षेत्रे गाजवलेला आणि ३ वेळा आपल्यापेक्षा जास्त असलेल्या बादशाही सैन्याला हरवलेला जहांबाज होता. त्यानेही आजवर पराभव बघितला नव्हता. औरंगजेबाच्या तालमीत तयार झाला असल्याने शिस्तीचा पक्का होता. त्याचा तोफखाना खुद्द औरंगजेबाने आपल्या एका पत्रात नावाजला होता. उभ्या भारतात असा तोफखाना कुणा दुसऱ्या स्थानिक राज्यकर्त्यांकडे नव्हता. मराठ्यांकडे याबाबतीत तर संपूर्ण आनंद होता. शाहुंचा सगळा भार त्यांच्या सरदारांवरती होता. जे येतील तेच सैन्य बरोबर आणणार होते. काही जण ऐनवेळी संभाजीराजांकडे वळायची शक्यताही होतीच. अशावेळी शाहुंना सर्वात मोठा आधार होता - राऊंचा. नेपोलियनचा पराभव करणाऱ्या ड्यूक ऑफ वेलिंग्टननेच, नेपोलियनचा गौरव करताना म्हंटले होते की "नेपोलियन स्वतः आघाडीवर आला की त्याच्या सैन्यात आपोआप चाळीस हजारांची भर पडल्यासारखे वाटत असे." तसेच बाजीरावांचा गौरव करताना छत्रपती शाहू महाराज म्हणाले होते की "मला कोणी, एका बाजूला एक लाखाची फौज आणि दुसऱ्या बाजूला एकटा बाजीराव असा पर्याय दिला तर मी निःसंशयपणे बाजीरावाला निवडेन." आता बाजीरावांची खरी कसोटी होती.

आता सामना होणार होता ५७ वर्षे वयाच्या मुत्सद्दी, पाताळयंत्री, आणि अनेकांचा कच्चे चावून थुंकून देणाऱ्या निजामाचा, नवख्या पण तडफदार बाजीरावांशी. खूप मोठ्या युध्दाचा अनुभव नाही. मोठे सरदार, कसलेलं सैन्य पाठिशी नाही, तोफखाना, बंदूकबाज हशम नाहीत. एकच गोष्ट अधिक असलेली - दुर्दम्य आत्मविश्वास.

बाजीरावांनी काही चाली मनात नक्की केल्या. चिमाजी अप्पांना त्यांनी शाहू छत्रपतींबरोबर राहू दिले. स्वराज्य आणि शाहुंची काळजी घ्यायची जबाबदारी चिमाजींवरती टाकून बाजीरावांनी निजामाला स्वतः सामोरे जायचे ठरवले. चिमाजींनीही लगेच बाजीरावांनी सांगितल्या बरहुकूम जुन्नर, पेडगांव, पाटस आणि खेड भागाचा बंदोबस्त करायला घेतला. हे सगळे होईतो १७२७ चा ऑक्टोबर उजाडला. दसऱ्याला बाजीरावांनी सीमोल्लंघन केले आणि पारनेर व अहमदनगरला उजवीकडे ठेवून ते औरंगाबादच्या दिशेने जाऊ लागले. ५ नोव्हेंबर १७२७ या दिवशी त्यांनी जालना लुटले. ऐवजखान चालून आल्यावर छोटीशी चकमक देऊन त्यांनी आपला मोर्चा माहुरकडे आणि मग सिंदखेडकडे वळवला. मग मध्येच आपण बऱ्हाणपूरकडे जातोय असं भासवून काही मैल पुढे जाऊन परत मागे आले आणि वाशिमकडे गेले तिथून पीरमंगरुळ वरून अग्नेय दिशेला कोकरमुंड्याला छावणी केली. यात १८ डिसेंबर १७२७ उजाडला. डिसेंबरच्या मध्यात त्यांनी वऱ्हाड गाठले. तसेच मागे फिरुन हदगाव लुटले. तिथे जाळपोळ करुन मोठा वळसा घेऊन पश्चिमेला खानदेशात शिरले. दिवसाकाठी ४० मैल या चकीत करणाऱ्या वेगाने त्यांनी हे सर्व केले. या मधल्या काळात चिमाजींनी शाहुराजांना पुरंदरास मुक्काम करण्यास सुचवले. बराचसा खजिना, दफ्तर वगैरे गोष्टींसकट शाहूराजांनी पुरंदरवती आश्रय घेतला.

बाजीराव मुघल हद्दीत घुसून नासधूस करु लागले. भीर जवळील निजामाने त्यांना शह द्यायला एक तुकडी औरंगाबादकडे रवाना केली. ऐवजखानही याच भागात असल्याने त्याने ही जबाबदारी स्वीकारले. स्वतःच्या हाताखालील तुर्कताज खानाला व रंभाजी निंबाळकराला पुण्यावरती सोडले. लोहगडपर्यंत त्यांनी लूटमार केली. निजाम दुसरीकडे आरामात चालला होता. एकतर स्वारी मोगली पद्धतीने चालली होती. बरोबर जनाना, दुकानदार, तंत्रज्ञ, आणि महत्वाचा म्हणजे अवजड तोफखाना. याउलट बाजीरावांकडे परिणामकारक तोफखाना अजिबात नव्हता ही त्यांची कमजोरी होती. पण स्वतःच्या कमजोरीलाच त्यांनी आपली ताकद बनवली. छत्रपती शिवरायांची धावती युध्दनीतीच वापरायचे ठरवले. आता फक्त तिच्यात परिस्थितीनुसार बदल करुन ती मोकळ्या मैदानावर योग्य पध्दतीने वापरण्याची गरज होती. ढाल, तलवारी, थोडेसे तीरंदाज आणि दोघांत एक जास्तीचा घोडा असे सडे सडे सैन्य बाजीरावांनी उभे केले होते. पोटही वाटेतल्या गावांतच भरायचे. यामुळे शत्रू विचारही करु शकणार नाही इतक्या वेगाने अनपेक्षित धक्के द्यायचे तंत्र त्यांनी आत्मसात केले होते.

## थोरले बाजीराव पेशवे आणि निजाम यांच्या हालचाली (कालपट: ऑगस्ट १७२७ ते २५ फेब्रुवारी १७२८) -





*नकाशा प्रमाणबद्ध नाही (संदर्भ - Bajirao – an Outstanding Cavalry General, ...)

निजामाला समजली. संतापून त्याने बाजीरावांचा पाठलाग करायला घेतला. निजाम बुऱ्हाणपुरला पोहोचला तेव्हा त्याला बातमी समजली की बाजीराव केव्हाच चांदवड जवळून नर्मदा ओलांडून भडोचच्या दिशेने गेले. निजाम गोंधळला, तरी शक्य तितका पाठलाग त्याने केला. बाजीराव अहमदाबादकडे गेले. बाजीराव गुजरातकडे का गेले ह्याचा अंदाज कुणालाच येईना. इथे बाजीरावांनी गुजरातकडे अफवा पसरवून दिली, की निजामच्या सांगण्यावरुन मोगलांच्या प्रदेशात खंडणी वसूल करायला जातोय. सरबुलंदखान घाबरला तो निजामाचा कट्टर शत्रू होता. त्याला अभय देण्याचे नाटक करुन बाजीरावांनी काही काळ गुजरात भागात छावणी केली. मुळात गुजरात मध्ये घुसण्याची २ कारणे होती १) निजाम बाजीरावांचा पाठलाग करत सरबुलंदखानाची हद्द मोडणार नाही ह्याची खात्री बाजीरावांना असावी. आलाच असता तर श्रीकृष्णाने कालयवनाला परस्पर मुचकुंद ऋषींतर्फे मारले तसे काहीसे करायला चांगली संधी होती. आणि २) बाजीरावांचा पाठलाग करताना निजामाला तापी आणि नर्मदा ओलांडावी लागली असती. व तोफखाना बराच काळ वेगळा पडला असता. पण निजाम शहाणा होता, बाजीरावांशी आणि सरबुलंदखानाशी एकत्र शत्रूत्व त्याला घ्यायचे नव्हते. निजाम मात्र विनाकारण बदनाम झाला.

विनाकारण आपले नाव पुढे केल्याने चिडलेल्या निजामाने बाजीरावांनाच आपल्या ट्प्यात आणायचे ठरवले. तो स्वतः पुणे भागात शिरला आणि लुटालूट सुरु केली. तसेही बाजीरावांनी पुण्यातील घोडदळ आपल्या बरोबर घेतल्याने पुणे असुरक्षित झाले होते. बिनविरोध पुण्यात शिरलेल्या निजामाने कोल्हापूरकर संभाजीराजांना शाहूंच्याही राज्याचा राजा जाहीर केले. शिवाय रामनगरच्या राजकन्येशी संभाजीराजांचे लग्न झाले त्यालाही तो उपस्थित होता (८ फेब्रुवारी १७२८). शाहूंनी बाजीरावांना पत्रांवरती पत्रे पाठवली. पण बाजीरावांच्या मनात काय होते ते कुणालाच समजत नव्हते. काहींनी तर बाजीरावांविरुध्द शाहुंचे कानही भरायला सुरुवात केली. निजामाला बाजीरावांची नवीन हालचाल कळली - ते खानदेशात उतरले आहेत असे कळल्यावर पुन्हा आपला भाग बाजीराव जाळणार ह्या भीतीने त्याने लवकर हालचाल केली. पेडगावजवळ भीमा पार केली आणि तिथून तो अहमदनगरकडे निघाला. बाजीरावांना धुळ्याजवळ असताना ही खबर मिळाली. निजामाचा उद्देश स्पष्ट होता - औरंगाबादला तळ बनवून तिथून पुढली लढाई लढायची. त्या आधी काहीतरी करणे गरजेचे होते.

निजामाला पुणतांब्यापाशीच गोदावरी नदी ओलांडावी लागणार हे दिसत होतं. कारण पुढे प्रवरा नदीचा प्रवाह मिळून गोदावरीचे पात्र विशाल होते. निजामाचे नदी ओलांडणे हा किमान ३ दिवसांचा कार्यक्रम होता. एकूण सैन्य ४० हजार होते. पैकी पहिल्या दिवशी बिनीचे सैन्य आणि दुकानदार, दुसऱ्या दिवशी निजाम, महत्वाचे सरदार आणि जनाना व सरते शेवटी तोफखाना याच क्रमाने तो नदी ओलांडणार हे देखील बाजीरावांनी सहज ओळखलं. या ठिकाणी बाजीरावांनी कसलेल्या योध्दासारखी चाल केली. निजामाचा तोफखाना वेगळा पाडण्याची तसेच निजामाची कोंडी करण्याची उत्तम संधी होती. आता निजामाला युध्दाला कुठे उभे करायचे हे बाजीराव ठरवणार होते. निसर्गाची मदत घेणे हे उत्तम लढव्वैयाचे लक्षण असते. बाजीरावांनी तेच केले.

पालखेडचे युद्ध (२५ फेब्रुवारी १७२८)




*नकाशा प्रमाणबद्ध नाही (संदर्भ - Bajirao – an Outstanding Cavalry General, मधील नकाशावरुन)

बाजीरावांनी सापळा रचला, ठिकाण होतं - "पालखेड." अग्नेय दिशेला उतार असल्याने त्या भागातले नाले पुढे उत्तर - दक्षिण वाहणाऱ्या शीव नदीस मिळतात. ही नदी पालखेडच्या चार मैल पूर्वेस आहे. नही लहानच. फेब्रुवारीचे दिवस असल्याने अधेमधे साचलेले डोह सोडून नदीस पाणी नव्हते. वर्षभर वाहणारी गोदावरी पालखेडपासून किमान १५ मैलांवरती. पालखेडच्या उत्तरेस जंगल व उंच टेकड्या ज्या पूर्व - पश्चिम पसरल्या होत्या. "शिकारीसाठी" इतके उत्तम ठिकाण मिळाले नसते. बाजीरावांजवळ सुमारे २५ हजारांचे घोडदळ होते. त्यांना हेरांकडून निजामाच्या हालचाली कळत होत्याच. पालखेड भागात त्यांनी विचारपूर्वक हालचालींना सुरुवात केली. निजामाला रसद, पाणी आणि तोफखाना यांपासून तोडायचेच, असे ठरवून सगळे काम चालू केले. आधीचे ३-४ दिवस पालखेडच्या आजूबाजूचा प्रदेश 'साफ' केला. जेणेकरुन निजामाच्या सैन्याला अजिबात अन्न मिळणार नाही. ठरल्याप्रमाणे आधी त्याची रसद नदीपार होऊ दिली आणि निजाम स्वत: जेमतेम नदी ओलांडतो तोच ही पुढे गेलेली रसद उधळून दिली. निजाम पालखेडजवळ येताच मल्हाररावांनी त्याचा पूर्वेचा रस्ता बंद केला. शीव नदीच्या दिशेने पिलाजी जाधव आणि स्वत: बाजीराव उभे राहीले. नदिपलीकडचा तोफखाना आणि निजाम यांच्यात दावलजी सोमवंशींनी भक्कम फळी उभारली. पालखेडमधले पाण्याचे साठे, ३०-३५ हजार लोकं, जवळपास तितकेच घोडे, काही शे बैल यांच्यासाठी किती दिवस निजाम पुरवणार? आणि महत्वाचे म्हणजे विहिरीतुन इतकं पाणी उपसणार कोण? रसद मारली गेलेली. असा धावता वेढा उभा राहिलेला. पैकी कोण कधी हल्ला करेल याचा भरवसा नाही. उपासमार, झोपेचा अभाव आणि चारही बाजूनी शत्रूची भक्कम फळी.

आडोश्यासाठी काही नाही. निजामासमोर २ पर्याय होते, जीवावरती उदार होऊन लढायचं किंवा सपशेल शरणागती. पैकी पहिला पर्याय नुकसानही करणारा होता शिवाय तोफखाना पुणतांब्याला अडकल्याने विजयाची शाश्वती नाही. सैन्य - घोडी उपाशी, तहानलेली आणि थकलेली होती. बाजीरावांची फौज ताजी होती. निजाम धूर्त होता - सर सलामत तो पगडी पचास.

निजाम - उल - मुल्कने शरणागती पत्करली. ज्या तोफखान्याच्या जोरावरती तो मराठ्यांना आणि बाजीरावांना लाह्यांसारखे भाजून काढण्याचे स्वप्न बघत होता त्यातून चंद्रज्योतींना लागते तितकी शोभेची दारुही त्याला उडवता आली नाही. गोदावरीच्या उत्तरेला निजाम आणि दक्षिणेला तोफा, चाट होऊन "आ" वासून बाजीरावांचा विजय बघत राहिल्या. अखेर तुर्कताजखान व पिलाजी जाधवांमार्फत बोलणी केली. ६ मार्च १७२८ या दिवशी तह झाला. तहातली मराठ्यांची १७ कलमे निजामाने मान्य केली. शाहू छत्रपतींचे सिंहासन बाजीरावांनी वाचवले.

ही लढाई सामान्य नव्हती. अतिशय विरुध्द बलाबलांची असलेली आणि तरीही रक्ताचा एकही थेंब न सांडता मुख्य लढाई राऊंनी जिंकली होती. या लढाईबद्दल ब्रिटिश फिल्डमार्शल मॉन्टेगोमेरी (ज्यांनी फिल्डमार्शल रोमेल सारख्या सर्वोत्तम जर्मन सेनानीला हरवले होते) आपल्या "The History Of warfare" या ग्रंथात म्हणतात - “The Palkhed Campaign of 1727-28 in which Baji Rao [I] out-generalled Nizam-ul- Mulk , is a masterpiece of strategic mobility.” तसं तर त्यांनी बरच लिहीले आहे पण हे वाक्य त्यांच्या एकूणच विश्लेषणाचे सार म्हणता येईल. या लढाईने बाजीरावांच्या समशेरीचा डंका भारतभर वाजला. या लढाईपासून खऱ्या अर्थाने मराठ्यांचा "अश्वमेध" सुरु झाला.


## सौरभ वैशंपायन.

Spayan25@gmail.com


## संदर्भ –


१. BAJIRAO – An outstanding Cavalry General – Col. R. D. Palsokar.
२. अजिंक्य योध्दा बाजीराव – जयराज साळगांवकर
३. जनसेवा समिति, विले पार्ले आयोजित “प्रतापसूर्य थोरले बाजीराव अभ्यास वर्गातील” टिपणे.

# चातुर्मास

चातुर्मास म्हणजे अनेक रंग एका चित्रात उतरवल्याचा भास जणू. किती गमतीदार मोसम आहे हा! उन्हाच्या झळा, थोडी वाऱ्याची झुळूक, ढगांचा गडगडाट, विजांचा कडकडात, मुसळधार पाऊस, पुन्हा सूर्यदेवांचे आगमन, हलकेच श्रावणसरींचा देखावा आणि मग गार गार ..थंडी. सर्व ऋतूंना सामावून नेणारा असा हा चातुर्मास आहे. तसेच हे उपवास आणि व्रतवैकल्याचे महिने. विशेषकरून नववधूंचा सण उत्सवांचा मौसम. बाळगोपाळांपासून पूजापाठ करणाऱ्या लाडक्या आजी आजोबांना हवा हवासा वाटणारा हा काल. कोणत्याही नविन वर्षाचे स्वागत ज्या जल्लोशात केले जाते तेव्हढ्याच भक्तीभावाने चातुर्मासाचे स्वागत केले जात आहे. पंढरीची वारी हे त्याचेच प्रतिक आहे. लाखो वारकरी दिंडीतून पंढरीच्या दिशेने निघतात. तुळशी वृंदावन घेऊन लाखो स्त्रिया पांडुरंगाकडे सौभाग्याचे आंदण मागतात. मानवता आणि भगवंताचा उत्कट लोभ या दिंडीत आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी हे अनुभवायचे क्षण या वारीमधे आहेत.

आषाढ घन कधी रिक्तहस्त नसतात. त्यात कविता असतात, मेघमल्हार असतो, चातकाचा एक विसावा असतो आणि नुकत्याच सासरी आलेल्या मुलीला माहेरी नेणारा माघारी असतो. आषाढ महिन्यात सुनेने आपल्या सासूचे मुख पाहू नये असे म्हटले जात असे. मग त्यावेळी तिने काय करावे? आपल्या माहेरी जायचे ना? त्यामुळे आषाढ हा माहेरवाशिणीसाठी अगदी मनमुराद आनंद लुटण्याचा महिना. आषाढात सासूचे तोंड पाहयचे नसते. पण एखादीला सासू नसेल तर काय? किंवा ज्येष्ठात दिराचे तोंड पाहयचे नसते. आता या रूढी प्रचलित असू शकतील. मात्र आजच्या धकाधकीच्या जीवनात अगदी काटेकोरपणे या प्रथा पाळता येतीलच असे नाही. असो.

आषाढाने ओले चिंब केल्यानंतर ऊनपावसाचा खेळ सुरू होतो. सोमवारी शिवामूठ, मंगळवारी मंगळागौर, शुक्रवारी जिवंतीका पूजन असे विविध व्रतांचे दिवस सुरू होतात. ्सर्वदूर आनंदी आनंद असतो. त्याचे कारण आपण जाणताच. गोपाळकाल्यात न्हाऊन प्रफुल्लित झालेला प्रत्येकजण गणराजाची आतुरतेने वाट बघत आहे. नवरात्रीचा नवेपणा आपण जपतोच आहोत. दिवाळी पहाट कशी गुलाबी थंडीची मजा देते. कार्तिक पौर्णिमा त्रिपुराच्या असंख्य माळा दीपमान झाल्या आणि चाउर्मास हलकेच संपत आल्याची चाहूल लागते.

**..........अनघा बापट**

# पंढरीची वारी

महाराष्ट्राचे वय किती?' असा प्रश्न कोणी विचारला तर प्रश्नकर्त्यांकडेच जो तो चमत्कारून बघायला लागेल! दोन-एक महिन्यापूर्वीच तर राज्याच्या स्थापनेचा सुवर्णमहोत्सव चांगला गर्जत-वाजत पार पडला. पण खरी गंमत तर इथेच आहे! परवाच्या १ मे २०१० रोजी आपण सगळय़ांनी सुवर्णमहोत्सव साजरा केला तो १ मे १९६० या दिवशी नकाशाच्या माध्यमातून ओळख निर्माण करण्यात आलेल्या भू-राजकीय एककाचा. पण 'ओळख' आणि 'आत्मखूण' यात फरक नाही का? मग प्रश्न येतो तो हा की, महाराष्ट्राची आत्मखूण कोणती? अवघ्या एकाच शब्दात या प्रश्नाचा सारा पैस सामावलेला आहे- वारी! 'वारी' म्हणजे पंढरीची वारी! 'वारी' या शब्दाचा यापरता दुसरा अर्थ या मराठी मुलखात तरी ज्ञात नाही, रूढ नाही.

आता पुढचा प्रश्न. 'मराठी मुलूख' तरी कशाला म्हणायचे? या प्रश्नांची निखालस सोडवणूक इरावतीबाई कर्व्यांनी केव्हाच करून टाकली आहे. ज्या देशातले लोक पंढरीला येतात तो महाराष्ट्र, अशी महाराष्ट्राची एक नवी व्याख्या मला कळून आली, असा निर्वाळा इरावतीबाईंनीच दिलेला आहे. त्यामुळे त्या पंढरीची वारी हीच महाराष्ट्राची आत्मखूण म्हणून गणली जावी, हे अतिशय स्वाभाविक नाही का? महाराष्ट्राचे 'महाराष्ट्र'पण वारीत उमटते. पंढरीची वारी हे खऱ्या अर्थाने 'महाराष्ट्र दर्शन' आहे. इथेही पुन्हा इरावतीबाईंची साक्ष बघण्यासारखी आहे. 'मी जवळजवळ सगळय़ा महाराष्ट्रभर फिरले आहे, पण सर्व देशाचे एका वेळी, एका ठायी होणारे दर्शन मला अद्भुत वाटले', हे त्यांचे वारीबाबतचे निरीक्षण खरोखरच विलक्षण अर्थगर्भ आहे. आता या सगळय़ा पाश्र्वभूमीवर, 'महाराष्ट्राचे वय किती?' या प्रश्नाचा ठाव घ्यायचा तर १ मे १९६० या दिवसाच्या कितीतरी मागे जावे लागेल. एक भक्तिपीठ म्हणून पंढरपूरचा महिमा पार सहाव्या शतकापासून गायला जातो आहे. इ. स. ५१६ मधील एका ताम्रपटात 'पांडरंगपल्ली' असा पंढरीचा आद्य निर्देश आढळतो. म्हणजे महाराष्ट्राची जडणघडण ही तेव्हापासून सुरू आहे.

परंतु पंढरीची वारी ही महाराष्ट्राची जी आत्मखूण आहे ती प्रस्थापित होण्याची प्रक्रिया अकराव्या-बाराव्या शतकापर्यंत संघटित होत आली असावी, असे मानण्यास जागा आहे. पंढरीच्या पायवारीला आज लाभलेले स्वरूप जे आहे ते त्या मानाने खूपच अलीकडचे आहे. 'वारी' या शब्दाचा अर्थ 'येरझार'! आपल्या आवडत्या उपास्य दैवताला भेटण्यासाठी विशिष्ट दिवशी अथवा विशिष्ट कालावधीत नित्यनियमाने येणे, येत राहणे म्हणजे वारी. 'वारी करणे' ही शब्दयोजना त्याचवरून तयार झाली. अशी वारी करतो तो 'वारीकर' अथवा 'वारकरी'. गंमत अशी की, 'वारीकर' हा शब्द योजून त्याची व्याख्याही ज्ञानदेवांनी त्यांच्या एका अभंगात केलेली आढळते. सर्वस्व विठ्ठलाच्या चरणी वाहणे म्हणजे 'वारीकर' होणे, अशी ज्ञानदेव 'वारीकर' या शब्दाची निखळ आध्यात्मिक उपपत्ती देतात. 'कायावाचामनेजीवे सर्वस्वे उदार। बापरखुमादेविवरु विठ्ठलाचा वारीकर' ही ज्ञानदेवांनी केलेली 'वारीकर' या शब्दाची व्यख्या. काळाच्या हिशेबाने नामदेवराय हे ज्ञानदेवांपेक्षा पाच वर्षांनी वडील. त्यांच्या घरात पंढरीच्या वारीची परंपरा होती, असे त्यांनीच खुद्द त्यांच्या अभंगात नोंदवून ठेवले आहे. याचा एक निर्विवाद अर्थ असा की, वर्षांतील काही दिवस पंढरीला समूहाने गात-नाचत जाणे, हे वारीचे स्वरूप १३ व्या शतकापर्यंत प्रतिष्ठित झालेले होते.

पंढरीची वारी हा भागवत धर्मप्रधान वारकरी संप्रदायाचा आगळा आचारधर्म आहे. चैत्री, माघी, आषाढी आणि कार्तिकी अशा वर्षातून किमान चार वाऱ्या तरी कराव्यात, असा संकेत! चार नाही जमल्या तर आषाढी-कार्तिकी या दोन तरी वाऱ्या कराव्यात. कारण या दोन दिवशी खुद्द पांडुरंगच भक्तांची वाट पाहत असतो, असा नामदेवरायांचा सांगावा आहे. 'आषाढी कार्तिकी विसरू नका मज। सांगतसे गुण पांडुरंग', असे मोठे भावविभोर वर्णन नामदेवांनी मांडलेले आहे. त्यातल्या त्यातही पुन्हा आषाढीच्या पायवारीचा सोहळा काही अनुपम्यच! कारण विठ्ठलाला भेटण्यासाठी आरंभलेल्या या विठ्ठल यात्रेत वारकरी पाऊल टाकतात ते संतांच्या संगतीने! विठ्ठलाच्या प्राणप्रिय असणाऱ्या वैष्णवांच्या पादुका पालखीत मिरवत, त्याच वैष्णवांच्या अमृतबोलांनी विठ्ठल महिमा वर्णत करत, 'गायें नाचें उडें आपुलिया छंदें। मनाच्या आनंदें आवडीनें' अशा देहभाव हरपलेल्या अवस्थेत पंढरीच्या दिशेने उचललेल्या पावलापावलागणिक महायागाचे महत्कृत्य घडते ही ज्ञानदेवांची खूण!

संतांच्या पादुका पालखीत ठेवून, छत्रचामरे व पताका मिरवत, टाळमृदंगाच्या घोषात, संतवचनांच्या कल्लोळात, नामगजर घुमवत पंढरीला जाणे, हे पंढरीच्या वारीचे आजचे जे स्वरूप आपल्याला दिसते तिचे आद्य प्रणेते-प्रवर्तक म्हणजे तुकोबारायांचे सगळ्यांत धाकटे चिरंजीव नारायण महाराज. महादेव, विठ्ठल आणि नारायण ही तुकोबांच्या तीन मुलांची नावे. नारायण महाराज सर्वात लहान. तुकोबांच्या पादुका पालखीत बरोबर घेऊन पंढरीला आषाढी यात्रेसाठी वारकऱ्यांच्या दिंडीसह भजनगायन करीत जाण्याचा परिपाठ नारायण महाराजांनी १६८५ सालापासून सुरू केला. आषाढीवारीच्या पालखी सोहळ्याचे प्रारंभीचे स्वरूप मोठे वैशिष्ट्यपूर्ण होते. दरवर्षीच्या ज्येष्ठ वद्य सप्तमीस तुकोबांच्या पादुकांसह पालखीचे देहूतून प्रस्थान होई. दुसऱ्या दिवशी, म्हणजे, ज्येष्ठ वद्य अष्टमीस नारायण महाराज पालखी घेऊन आळंदीस जात. तिथून ज्ञानदेवांच्या पादुकांसह, ज्ञानोबा-तुकोबांच्या पादुका एकाच पालखीमध्ये ठेवून पालखी सोहळा ज्येष्ठ वद्य नवमीस पुण्याला येऊन पुढे पंढरपुराकडे कूच करत असे. पालखी सोहळ्याच्या या आद्य प्रवर्तकाचे, तपोनिधी नारायण महाराजांचे, 'सकळ वैष्णवां वाटे जीव प्राण' असे अत्यंत हृद्य गौरवगान तुकोबांचे शिष्य निळोबा पिंपळनेरकरांनी केले आहे ते याचसाठी!

आज आपण अनुभवत असलेल्या पालखी सोहळ्याचे जनक असणाऱ्या तपोनिधी नारायण महाराजांनी प्रवर्तित केलेल्या गंगोत्रीचेच रूपांतर विशाल अशा गंगौघात यथावकाश घडून आले. महाराष्ट्राच्या अक्षरशः कानाकोपऱ्यांतून वारकरी, दिंड्या आणि पालख्या आषाढी एकादशीस पंढरीत येतात. भीमेला भक्तिरसाचा पूर येतो. पालखी सोहळ्याची वाटचाल, रचना, दिंडी, दिंड्यांची जडणघडण व आकृतिबंध याला आजचे सुबद्ध रूप येण्यात हैबतरावबाबा आरफळकरांचे सेवाश्रेय अलौकिक आहे. ग्वाल्हेरकर शिंदे सरकारांचे सरदार असलेल्या हैबतबाबांनी ज्ञानदेवांच्या पालखी सोहळ्याची धुरा १९ व्या शतकात पेलत वारीच्या आचारधर्माला आचारसंहितेची जोड पुरविली. दिंडीची आजची रचना त्या वास्तवाची साक्ष पुरविते. भागवतधर्माची भगवी पताका घेतलेले पताकाधारी अग्रभागी, एका रांगेत चारजण अशा पद्धतीने चौघा-चौघांच्या रांगांनी अभंग म्हणत चालणारे टाळकरी त्यांच्या मागे, टाळकऱ्यांना लयतालाची साथ देणारा मृदंगमणी त्यांच्यामधून, संपूर्ण दिंडीचे सूत्रसंचालन करणारा विणेकरी टाळकऱ्यांच्या मागे आणि डोईवर तुळस वा पाण्याची कळशी घेतलेल्या दिंडीतील महिला विणेकऱ्याच्या मागे अशी दिंडीची रचना असते. याच शिस्तीने सोहळ्यात दिंडी चालते आहे ना, हे पाहण्यासाठी प्रत्येक दिंडीत एक चोपदारही असतो. पालखीबरोबर असणाऱ्या कर्णा अगर तुतारीबरहुकूम दिवसभराची वाटचाल व विश्राम यांचे वेळापत्रक हलतचालत असते. एखाद्या लष्करी तुकडीच्या शिस्तीने दिंड्या आणि सोहळा मार्गक्रमण करत असतो. हे सारे संस्कार पुण्यश्लोक हैबतबाबांचे!

याच शिस्तीने हा सोहळा आजवरच्या ३२५ वर्षांची वाटचाल करत आला आहे. वारी हा वारकरी संप्रदायाचा केवळ आचारधर्म नाही. ती या संप्रदायाने रुजवलेली एक विशिष्ट जीवनदृष्टी आहे. कर्मप्रधान, प्रवृत्तिपर, विवेकाधिष्ठित आणि समाजसन्मुख भक्तितत्त्वाचा आदर्श दैनंदिन जीवनात मुरण्यासाठी शतकानुशतके गतिमान असलेले हे एक फिरते अभियानच जणू! वारी म्हणजे संतबोधाचा जागर घडविणारे फिरते, चल्विद्यापीठच! अखिल जीवमात्राबद्दलचे अकृत्रिम, निखळ प्रेम हा संतबोधाचा गाभा होय. विश्वात्मक चैतन्याची सेवामय भक्ती हा संतविचाराचा जीवनरस. लौकिक जीवन निरामय, सत्कर्मरत बनविणे, हे त्या भक्तीचे आद्य उद्दिष्ट. या भक्तीला जोड आहे ती लौकिक जीवन अर्थपूर्ण बनविणाऱ्या कर्माची! ज्ञान हे या कर्माचे डोळे, तर नीती ही त्या भक्तीचे अस्तर होय. नीतिमान भक्तीचा वसा ल्यालेल्या समाजमनस्क साधकांचा मेळा म्हणजे वारी. हा मेळा ज्याला भेटण्यासाठी वाटचाल करतो तो विठ्ठलही त्याच्या भक्तांसारखाच - प्रेमळ, कर्मरत आणि लौकिक जीवनाचा आदर करणारा! विठ्ठलाकडे काही मागण्यासाठी ही वारी नाही. वारकरी मुक्तच असावा, हाच भागवतधर्माचा संकेत. मुक्ती प्रपंचापासून नाही तर अहंकार आणि उपाधीपासून! त्या मुक्तीचे दान जगाला करण्यासाठी भक्तिपंथाने निघालेल्या विठ्ठल भक्तांचा मेळा म्हणजे वारी!

वारकऱ्यांच्या हातातील भगवी पताका, गळय़ातील तुळशीची माळ, पितळेच्या तुळशीवृंदावनातील तुळस, अंगावर धारण केलेले गोपीचंदनाचे टिळे ही सारी बाहय़ लक्षणे, लौकिक जीवन निरामय बनविण्याचा वस्तुपाठ देणाऱ्या नीतिमान भक्तितत्त्वाच्या गाभ्याचे संबोधन घडवतात. दुरिताचे तिमिर हटण्यासाठी ईश्वरनिष्ठांची मांदियाळी पृथ्वीवरील प्रत्येक जिवास अनवरत भेटत राहो, हे जे मागणे ज्ञानदेवांनी विश्वात्मक देवाकडे मागितले त्याचे लौकिक प्रगटीकरण म्हणजे वारी होय. आज काळ बदलला आहे. त्याप्रमाणे वारीचे बाहय़ रंगरूपही बदलते आहे. ते स्वाभाविकच आहे; परंतु वारीचा गाभा मात्र तोच आहे. भूतमात्रांच्या बुद्धीला जखडलेले वाकडेपण गळून पडावे यासाठी झटण्याची जीवनदृष्टी देणारी भक्ती ही पंढरीच्या वारीची निजखूण होय. तर ही अशी पंढरीची वारी महाराष्ट्राची आत्मखूण आहे. १ मे १९६० पासून रूढ झालेली  महाराष्ट्राची 'ओळख' अर्वाचीन असली तरी त्या महाराष्ट्राची 'आत्मखूण' मात्र प्राचीनच आहे. 'जावे पंढरीसी,आवडी मनासी' असे म्हणत ती आत्मखूण जपणे हा आजच्या प्रत्येक वारकऱ्याचा धर्म आहे.. आणि जबाबदारीही!

योगेश काटदरे

# कथा

# जानी दुष्मन

मी फ़ेसबूकवर अपडेटस चेक करत होतो. मित्रांच्या अपडेटसला 'like' करत. असे पंचविस-तीस 'like' दहा-वीस छान असे कमेंटस आणि भन्नाट, लय भारी यासोबतच ग्रेट असे टाईप करत बसलेलो. खरंतर ह्या सगळ्याचा देखील कंटाळा आलाय. दोघातिघांचे वाढदिवस फ़ेसबूकने आठवन करून दिले, त्यांच्या वॉलवर वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या; त्याही कुठूनतरी कॉपी करून पेस्ट करायच्या.

मुलीचा सुंदर फोटो असला की 'वन अपॉन कॉस सी' असं टंकायचं. जॉमेट्रीतलं ट्रिग्नॉमेट्री ज्यांना माहीत आहे त्यांना हे कळायचं.

फ़ेसबूकमुळे जबरदस्तीनं वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या सारखं वाटतं. खरंतर सगळ्यांचे वाढदिवस लक्षात ठेवणं अवघड आहे परंतु फ़ेसबूकमुळे ते जरा सोपं झालं; पण साली सगळी मजाच निघून गेली. पाच-पन्नास शुभेच्छा मध्ये आपली शुभेच्छा कुठेतरी एका कोप-यात पडल्यासारखी! त्यावर ज्या व्यक्तीचा वाढदिवस आहे त्यानं एकतर 'like' किंवा thanks टंकावं. सालं सगळं कसं ड्युटी असल्यासारख.

काही ग्रूप जॉईन केलेले. ग्रूपवर कार्यरत असलेली मंडळी काहीतरी लिहिणं बंधनकारक असल्यासारखी सारखी काहीतरी लिहीत असतात, अगदी भाकरी थापल्यासारखी! चुटकीसारखी साहित्य निर्मीती करणारी. मग ते काहीही असो. अन बाकी सगळे त्याला 'like' करतात. सगळाच आव आणलेला! मग ज्याने लिहीलं ही त्याची जबाबदारी ठरते की त्याने परतफ़ेड करावी. दिवाकरांनी एका नाट्यछटेत लिहील्याप्रमाणे. तुम्ही मला चांगले म्हणा, मी तुम्हाला चांगले म्हणेन! माहीत नाही किती मनापासून असतं आणि किती संकेत पाळण्यासाठी?

सगळेच काहीबाही लिहीतात असं नाही, काही मंडळी छान लिहीतात, परंतु त्यांचं ही लिखान असंच यात कुठेतरी हरवलेलं. मुलींच्या अगदी पाचकळ फ़ुटाण्यांना टीन-एजरपासून वयस्कांपर्यंत सगळ्यांचेच 'like' आणि कमेंटस मिळत असतात.

मला आजकाल सोशल नेटवर्किंगचा कंटाळा येतोय. तेवढ्यात माझा जानी-दुश्मन आला. अगदी घाईतच. नेहमीप्रमाणे!

"चल ना लवकर तयार हो, आपल्याला जरा जाऊन यायचंय." तो म्हणाला.

कुठे, काय हे विचारायच्या भानगडीत न पडता मी कम्प्यूटर शट-डाऊन केला आणि कपडे बदलून तयार झालो. तोपर्यंत वहिनीने चहा बनवला. आज ह्याला चहा इथे घरी नव्हता घ्यायचा, थर्मॉस्फ़्लास्कमध्ये भरून घेतला, आणि आम्ही त्याच्या पल्सरवर निघालो.

"तू मला सांगणार आहेस का, आपण कुठे चाललो म्हणून?" मी म्हणालो.
"तू बस रे, आत्ता पोहचूच आपण."
सरळ आम्ही आकाशवाणी चौकात सिग्नलवर एका बाजूला बिग बाजार समोरच्या पार्किंगकडे वळलो.

"बिग बाजार मध्ये जायचंय? काय घ्यायचं? ईथं काय चहा भेटत नाही का रे?“ माझी बड-बड न ऐकता त्यानं गाडी पार्कींगमधे लावली. अन सिग्नल कडे निघाला.

“इकडे कुठे चाललो आपण?"
"..........................."
" अरे काही तं बोल.“
तरीही तो डावी-ऊजवीकडे पहून रस्ता ओलांडून वाहतूक पोलिसाजवळ पोहोचला. मीही रस्ता ओलांडला. त्यानं मॉंसफ़्लास्कमधला चा कपात ओतला आणि त्या वाहतूक पोलिसाला दिला.
मी एकदम अवाक!
तो पोलिसही थोडा गोंधळला. तो आमच्याकडे वेगळ्याच नजरेनं पाहू लागला.मला थोडं वेगळंच वाटलं. वाटलं ह्याला कधीतरी सिग्नलवर पकडलं असावं, त्यांनी ह्याची गाडी तशीच पैसे न घेता सोडली असेल. त्यामुळे...

""चहा घ्या ना काका." जानी-दुश्मन म्हणाला.
त्यांनी चहा हातात घेतला परंतु त्यांची नजर आजु-बाजूला कसला तरी शोध घेत होती. नजरेत संशय दाटलेला.
"काय स्टिंग ऑपरेशन करत नाही ना? नायतर मायला आमची व्हायची गोची."
"नाही हो काका, तसं काहीही नाही." मी म्हणालो.
" नाही हो, आजकाल कुणी स्वार्थाशिवाय चांगलं वागायला लागला की संशय यायला लागतो. सवयच नाही राहीली. त्यातल्या त्यात आम्ही पोलिसवाले.“

"तुम्ही दिवसभर असे ईथे ऊभे असता ते जनतेसाठी. भलेही त्यासाठी पगार मिळत असेल; परंतु बारा-बारा तास सतत असं ऊभं रहायंचं; त्यातूनही सगळे पोलिसांवरच रोष व्यक्त करतात. नजरेत तिरस्कार. जसे सगळेच भ्रष्टाचारी आहेत! आमच्यासाठी तुम्ही एवढं करतात, आम्ही थोडीशीदेखील परतफ़ेड केली, तुमच्यावर देखील माणूस म्हणून प्रेम केलं, तुमची काळजी केली तर तुम्हालाही उभं रहायला देखील बळं येयील. समाजाला आपणही हवेसे आहोत ही भावनाच एखाद्याला बदलू शकते. आणि हा धन्यवाद म्हणण्याचा एक छोटासा प्रयत्न आहे.

वाहातूक पोलिसानं चहा घेतला. त्यांच्या डोळ्यांत पाणी आलं! त्यांनी माझ्या जानी दुश्मनाला कडकडून मिठी मारली. भावनेनं ओथंबलेली गळा भेट पाहून मी अगदी सदगदीत झालो.

सालं फ़ेसबुकवरच्या रोजच्या शेकडो 'like' पेक्षा असं एखादं 'like' जगण्यास नवी उर्मी मिळवून देतो. हे खरं सोशल नेटवर्किंग! आपण देखील रोज असं एखादं 'like' क्लिक करावं असं वाटलं.

माझं मन कसं काठोकाठ भरलेलं. फ़ेसबुकवर जणु मलाच नागडं करून माझा फ़ोटो अपलोड केलेला अन सगळे त्याला ’like' करताहेत. किती खूजे आहोत ह्याच्यासमोर आपण! माझी मलाच विकृत प्रतिमा वेळोवेळी दाखवतो. म्हणूनच मी ह्याला जानी दुश्मन म्हणतो. मला ह्याच्या मैत्रीचा अभिमान वाटतो; अगदी सार्थ अभिमान!
त्या वाहतूक पोलिसाला तसाच भावनाविवश अवस्थेत सोडून आम्ही लगेच परत निघालो.

ऐन सनासुदीचे तीन दिवस बेपत्ता झालेला जानी दुश्मन आज अचानक अवतरला.
"वहिनी, मला खूप भूक लागली, काही खायला द्या ना." तो वहिनीला म्हणाला.
"भावजी फ़क्त दोन मिनीट हं." वहिनी म्हणाली.
"वहिनी मॅगी करताहेत का, ’बस दो मिनीट’." मी हसत म्हणालो.
"आत्ता करते कांद्याचं थलिपीठ."
वहिनी काही करत बसू नका, जे असेल ते द्या. फ़रसाण, चिवडा काहीही चालेल." तो म्हणाला.
"कुठे होतास तीन दिवस?" मी विचारलं.
"इथंच होतो रे."
"मग लक्ष्मीपुजनाला का नाही आलास? गावाकडे गेला होतास का?"
"नाही रे इथंच होतो, जरा कामात होतो."
त्यानं पेपर हातात घेतला, अन बातम्या चाळू लागला.

बाहेर ताशा वाजवण्याचा आवाज येऊ लागला. काय वाजतय हे पाहण्यासाठी आम्ही दोघं दरवाज्यात जाउन ऊभं राहीलो. एक रंगानं काळी-सावळी.... कसली काळी-सावळी? एकदम काळीकुळीत बाई..एका लहानग्याला कुशीत घेऊन ताशा वाजवत होती. फ़ाटकी साडी, केसांच्या झिंज्या कडेवरील मुल एकदम कुपोषीत... हात पाय बारीक झालेले... सोबत एक सात आठ वर्षाचा मुलगा. खाली फ़्रॉक, वरती उघडाबंब. कपाळावर गंध लावलेला, गळ्याला, कानाला, गालावर रंग फ़ासलेला. हातात एक सोट घेउन स्वतःला मारतोय. कडाड-कडाड आवाज करत स्वतःला सोट मारतोय. बाई वाजवतीय.. केविलवाणा चेहरा करून, काही दानधर्म करा, पाच रुपये द्या ना दादा; अशी विनवणी करतेय..
तिचा असला अवतार पाहून तिची दया येण्याऎवजी मला तिची किळस वाटली. तोपर्यंत वहिनी अन दादा दरात येऊन आमच्या पाठीशी उभे. ही बाई सरळ घरात घुसते की काय म्हणून वहिनी थोड्या घाबरल्या, अन आत गेल्या.
"तुम्ही आत या अन दरवाजा लोटून घ्या." वहिनी असं दादाला म्हणाल्या.
"चला रे आत चला." दादा म्हणाला.
"जाऊ दे यार, ह्यांना कामधंदा करायला नको, नुसतं आयतं बसून खायला हवं." मी म्हणालो.
तो आत आला, मी दरवाजा लावून घेतला.
तो छोटा मुलगा कडाकड अंगावर सोट ऊठवतोय. त्याची आई ताशा वाजवतीय..काकुळतीला येऊन विनवणी करतीय...एकदम लाचार...मी अजुनही खिडकीतून पाहतोय, मला तिच्या वाजवण्याचा त्रास होतोय.तो मुलगा आता समोरच्या घराकडे निघाला. त्यांनी ह्याला येतांना पाहून दरवाजा लावला.
बाईचा आवाज आता कर्कश्श...."वाढ ओ माय....गरीबाला दान दे... भीक दे...तुहे पोरं सुखात राहतील."
टीव्ही वर मराठवाड्यातील कुपोषणावर एक माहितीपट चालू... मला ती कुपोषीत मुलं पाहून त्यांची कणव आली.
"सालं सरकार, काही उपाययोजना करतं की नाही."
"............................" जानी दुश्मन शांत.
"लोकांनी तरी अशा लोकांना खायला द्यावं यार." मी म्हणालो.
वहिनींनी तोपर्यंत कांद्याचं थालपीठ आणलं. आमच्या दोघांच्या हातात दोन प्लेट दिल्या. वहिनी छान थालपीठ करते. जानी दुश्मन ने एक घास खाल्ला. दुसरा तुकडा मोडला, अन काहीतरी स्वगत बोलत प्लेट घेऊन उठला.
"काय म्हणालास?" मी  विचारलं.
हा दरवाजा उघडून अंगणात. त्या बाईला आवाज दिला. तिला कंपाऊंड मध्ये बोलावुन बसायला सांगितलं. अन हातातली प्लेट तिच्यासमोर केली.
"अरे, हे काय रे? रात्रीचं आहे ते देऊ ना आपण तिला."
"................................"
"वहिनी रात्रीची पोळी-भाजी आणा बरं." मी म्हणालो.
"ती राहू दे, ती मी खातो." जानी दुश्मन म्हणाला.
"अरे साजूक तुप लावलेलं थालपीठ होतं."
मला थोडं वेगळंच वाटलं. सालं रात्रीचं दिलं असतं ना तिला. तोपर्यंत ती बाई अन तो मुलगा थालपीठ बकाबका खात होते. खुप भुकेले होते बहुदा. त्यांच्या चेह-यावरचा आनंद पाहत जानी दुश्मन कुठेतरी हरवलेला. त्यांच्या पोटात अन्न गेल्याने ते सुखावले. चेह-यावरची तृप्ती पाहून मलादेखील बरं वाटलं. वहिनींनी आणखी थालपीठ वाढलं.
आत्ता दोन मिनीटापुर्वी मी कुपोषीत मुलं पाहूण वांझोटी सहानुभूती दाखवत होतो. प्रत्यक्ष कृती मात्र शुन्य. एखाद्या न्युज चॅनलवर जशी चर्चा करून आपण फ़ार मोठं समाजकार्य करतोय, अन आपल्याला कुणालाही कसलेही प्रश्न विचारायची मुभा आहे असं समजणाऱ्या संपादकांसारखी माझी अवस्था आहे. प्रत्येक इश्यु कॅश करणे एवढाच हेतू असण्यासारखं होतं ते.
सालं आपण समाजसेवा करायची म्हणतो ते पण शिळं पाकं, फ़ेकायचं अन्न असं खायला देऊन. तेच अन्न स्वतः खाऊन हातातलं ताट असं देण्यासाठी फ़क्त जानी दुश्मनच हवा. आपला तो पिंड नाही. आपण शिळंपाकं अन्न देऊन पुण्य कमावल्याच्या भ्रमात वावरतो.
तांब्या भर पाणी पिऊन ती बाई अन तो मुलगा तृप्त झाले. त्या लहानग्याला अन मुलाला असं पाहून वहिनीच्या डोळ्यात पाणी आलं. त्यांनी डोळ्याच्या कडा टिपल्या. माझी मलाच लाज वाटली. आपण ह्याच्या पासंगाला देखील पुरणार नाही. हे मला सुचायला हवं होतं मला का नाही सुचलं? मी विचार करू लागलो, हा जन्माला येतांनाच कसली तरी अस्वस्थतेची गुटी पिऊन आलाय. आणि हा असा स्वच्छंद जीव मित्र असण्याच तरी आपलं नशीब आहे...
प्रत्येक वेळी हा मला असा माझाच विकृत चेहरा दाखवतो. मी विचार करू लागलो.

आपण स्वतः मंदीरात साधी उदबत्ती लावायला जात नाही, अन वर्गणी देऊन पुण्य केल्याच्या भ्रमात वावरतो. मुळात वर्गणी जमा करायची लाजीरवाणी वेळ आली याबद्दल काहीही वाटत नाही, त्याचीही समर्थनं तयार आहेत आमच्याजवळ. म्हणूनच मंदीरात दिवा, धूप , अगरबत्तीसाठी घरटी पाचशे रुपये वर्गणी जमा करायची वेळ आली. गावोगाव एवढी मंदीरं आहेत...कुठेही वर्गणी नाही. वर्गणी देणाऱ्यांना वाटतं आपण धर्माचं काम करतोय अन वर्गणीच्या नावाखाली हजारो रुपये
जमा करणा-यांना पैसा खाण्याचा एक नवा मार्ग मिळाला.

मला नेहमी कोडं पडतं, हे असं करायचं , हे मला का सुचत नाही? मी तर त्या बाईला ताट देऊ नको म्हणालो होतो. वहिनीने पुन्हा थालीपिठ आणून दिलं. जानी दुश्मन नं ते संपवलं. थालपीठ छान झाल्याची पावती देऊन, सायंकाळी परत येतो म्हणून तो अंतर्धान पावला.
"काय घाईत असतो रे हा नेहमी?" दादा मला म्हणाला.
"हं........" मी.

दुपारी बाळूचा फोन आला त्यानं सांगितलं की, जानी दुश्मन मागील तीन दिवस नायगावच्या झोपडपट्टीत असलेल्या समाजमंदीरात मुक्कामाला होता. माझ्याकडून विजयचे जुने कपडे घेऊन गेला होता. सगळ्या मित्रांकडून फ़राळ अन काहीबाही जमा केलं, कपडे, फ़राळ अन स्वतःच्या पैशानं फ़टाके घेऊन तिथं मुलांसोबत दिवाळी साजरी केली.

मागील तीन दिवसांचं कोडं सुटलं होतं. मी वहिनीला सांगितलं. दादा देखील होता समोर.
"तुझा मित्र बाकी ग्रेट आहे यार!" दादा म्हणाला.
मला खूप छान वाटलं.
"वहिनी म्हणाली,"लग्न झाल्यावर काय होईल ते होवो.“

## रघु व्यवहारे

## मेहंदीच्या पानावर ..

अखेर घाईगडबडीत श्रुती एकदाची लग्नघरी पोहचली ..
आणि अनायसे समोर आलेल्या वैजुच्या आईने लगेचच तिचे स्वागतही केले
"अशी कशी ग मैत्रीण तू ..घर बदलले तर मैत्रीही बदलते का ? ..
लग्नाला आठवड्याभर आधी येइल म्हणंत होती आणि फक्त दिड दिवस आधी उगवलीस ...
वैजू बघ..कसा नाकावर राग घेवून बसली आहे ते ..
आणि मेहंदीही वाट बघतेय तुझी.. अजून कोराच आहे हात पोरीचा ..जा लवकर..!"
तशी श्रुती उत्तरली . "खूप प्रयत्न केला आधी येण्याचा पण जॉब मधून सुट्टीच नाही मिळाली ..
बरे नंतर बोलते आधी वैजुला भेटते" म्हणत श्रुती घाई घाईने वैजुच्या रूम कडे पळाली.
नातेवाईक आणि आप्तेष्ट लोकांनी घर गजबजून गेले होते ..
खरच लग्न घर म्हटले तर एक वेगळाच माहोल असतो ..एक वेगळाच सुवास असतो त्याचाच दरवळ सगळीकडे होता.
वैजूचा राग घालवायला जरा वेळ लागला श्रुतीला पण मैत्रिणीच ती ..काही वेळात राग अदृश झाला.
लग्नखरेदीच्या ..नवरदेवाच्या... अनेक गमती जमती सांगून झाल्यात...
"वैजू , आता मेहंदी काढण्यास हरकत नाही .."
श्रुतीचे बोलणे मान्य करत होणारी नववधू सावरून बसली आणि मेहंदी काढून घेण्यास उत्सुकही झाली.
मेहंदी काढायला वैजुने हात पुढे केला आणि श्रुतीच्या मनात मात्र आठवणींची झुळूक दाटली ..
नकळत वैजुच्या आठवणीत ती रमत गेली .. मेहंदीच्या पानावरच्या अनेक आठवणी मनात गर्दी करायला लागल्यात..
वैजू आणिश्रुती दोन जिवलग मैत्रिणी, शाळेत पाचव्या इयत्तेत जमलेली हि मैत्री आजतागायत दृष्ट लागण्याजोगी खुलली होती.
श्रुती म्हणजे वैजूची मैत्रीण आणि वैजू म्हणजे श्रुतीची मैत्रीण हीच त्यांची मैत्रीची व्याख्या होती ..ओळख होती .विश्व होते.
दोघींचा एकमेकींच्या घरी हक्काचा वावर होता
वैजुला मेहंदीने हात रंगवून घ्यायची आवड होती तर श्रुती मेहंदी काढण्यात पारंगत होती.
अगदी शाळेतील दिवसापासून हा छंद दोघींनीही जोपासला होता...
श्रुती कधी अरेबियन डीझाइन्सने तर कधी सलग कोपर्यापर्यंत वैजूचा हात रंगवत असे..
आणि दुसर्या दिवशी मेहंदी किती रंगली याची उत्सुकता दोघींनाही राहत असे.
मेहंदीचा रंग गहरा असला कि दोघींची कळी खुलत असे ..मग चालू लेक्चर मधेही मेहंदीचे विषय रंगत ..
श्रुतीने जणू मेहंदी विषयात पी एच डी केली होती तर वैजू मात्र नवशिक्या जुनियर सारखे सार काही ऐकत राही ..
हळू हळू दोघीही मेहंदीत गुंतत जात, मेहंदीच्या रंगासोबत दोघींची मैत्रीही अशीच गेहरी होत जात होती.
मेहंदी काढतांना मेहंदीचा विषय नकळत बाजूला जात असे आणि मनातल्या अनेक गोष्टी एकमेकींना सांगितल्या जात असत.
खरच मैत्रीण हे नातेच असे असते हक्काचे आणि आपलेपणाचे माहेरघर असते ..
बहिण नसलेल्या मुलींना मैत्रीण हीच बहिण असते .. याचीच प्रचीती दोघीनाही येत होती..
एक छानसी मैत्री नकळत खुलली होती .याची जाणीव सगळ्यांच झाली होती..
"वैजुच्या लग्नात मेहंदी काढायला कुणाला शोधण्याची गरजच नाही.."
गमतीत दोघींच्या घरातील लोक असेच काहीसे बोलून जात..
श्रुतीही खुश होई .. "ती काळ्या दगडावरची पांढरी रेघ समजा .. वैजुच्या हातावर लग्नाची मेहंदी मीच काढेल" असे श्रुती घरच्यांना सांगत राही .
असेच हसत खेळत उन्हा पावसात आयुष्य पुढे सरकत होते ..
आणि कधी गमतीत वाटणारे ते विधान आजच्या दिवशी सत्यात उतरले होते ..
आजही त्याच उत्सुकतेने वैजुने मेहंदी काढायला हात पुढे केला होता .
पण आज पहिल्यांदाच श्रुतीला मेहंदीची डीसाईन्स सुचत नव्हती ...

का कुणास ठावूक पण भरलेल्या घरात लग्नघरातील धावपळीतही श्रुतीला एकटे एकटे वाटत होते ..
या क्षणाला तरी साराच अबोला आणि शांतता ..मन नुसतेच वेगवेगळे विचार करत होते ..
मुलांची मैत्री लग्नानंतरही तशीच असते ..त्याच हक्काने ती एकमेकांना भेटत
राहतात ..मग मुलींच्या मैत्रीचा रंग लग्नानंतर का फिका पडावा ..

आजवर ज्या हक्काने वैजुच्या आयुष्यात मी वावरत होती ..उद्या मात्र ना तो हक्क
असेल ..ना त्या हक्काने वैजू माझ्या आयुष्यात असेल ...
सासू सासरे नवरा घर सासर आणि माहेर यात वैजू रमत जाईल पण तिच्या ह्या नव्या आयुष्यात मी कुठे असेल ...
वैजुला माझी सवय आहे गरज आहे .. छोट्यातील छोटी गोष्ट मला सांगण्याशिवाय या वेडीला चैन पडत नाही ..
नव्या घरी गेल्यावर तिला माझी गरज असेल तर ...
खरच लग्नानंतर मुलीच आयुष्य कमालीचे बदलते ना ... पण मुलीच्याच नशिबात असे सारे का लिहिलेय ...
एक ना विविध नाना प्रश्न ..श्रुतीच्या डोक्यात विचारांचे थैमान सुरु झाले होते ..
हळू हळू मेहंदीने वैजुच्या हातावर आकार घ्यायला सुरवात केली होती ..ज्या कल्पकतेने श्रुती मेहंदी रंगवत जात होती नक्कीच कौतुकास पात्र होती ..
पण मनात मात्र ती वैजुला कायमचा साठवण्याचा प्रयत्न करत होती ...
एवढा सारा वेळ ती वैजुशी शब्दानेही बोलली नाही ..आठवणीतच आठवत राहिली ..मुलामुलींची मैत्रीतील फरक तिला नकळत छळत राहिला ...
लग्नघरातील वयस्कर आजीच्या गाण्याने मात्र श्रुतीच्या कोरड्या विचारांना अश्रूंची साथ मिळाली ..
" पाखरासारखी उडून गेली ..ज्याची होती त्याने नेली ..आपली माया व्यर्थ गेली ..!"
आजीच्या गाण्यात अनुभवाची झलक होती ..
श्रुतीला मात्र अगदीच भरून आले ..हा गर्दीतला एकांत तिला नकोसा झाला ..
वैजुने तरी काहीतरी बोलावे म्हणून श्रुतीची नजर वैजुकडे गेली ...
"सासरची नाती जपायला माहेरची माती का विसरावी लागते? " श्रुतीच्या मनातीलच सारे प्रश्न वैजुच्या चेहऱ्यावर होतेत ..
ती अबोल होती..श्रुतीसारखीच गर्दीत एकटी..शांत शांत पण ओघळणारे अश्रू सारे काही सांगत होते...
वैजुने श्रुतीकडे बघितले आणि हा अबोला सुटला ... तिच्या जिवलग वेड्या मैत्रिणीला तिने घट्ट मिठी मारली..
काही क्षण दोघीही रडत राहिल्यात आणि डोळ्यातील अश्रुंमधून नात्यांची न सुटलेली कोडे सोडवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत राहिल्या ....!

**डॉक्टर युवराज पाटील...!**

# प्रवास

# डेस्टीनेशन कैलास मानसरोवर

## प्रकरण तीन

## पूर्व तयारी

माझा रोज पहाटे उठून २ वेळा पर्वतीची टेकडी चढायचा सराव चालू होता. तसे मी गेले वर्षभर पर्वतीला नियमीतपणे जात होतोच. "इन सर्च"ने दिलेल्या यादीप्रमाणे सामानाची जमवाजमव सुरू केली होतीच. सर्व प्रथम अॅक्शनचे "ट्रेकर" बूट घेतले. माझ्याकडे दुसरे बूट होते. पण त्याचा तळ हा सिंथेटीक होता. आणि सिंथेटीक तळाचे बूट ओल्या खडकावरून, दगडावरून घसरण्याची शक्यता असते, म्हणून मग हे खास रबरी तळाचे बूट घेतले. नंतर थर्मल इनर वेअर घेतले. भरभक्कम ग्लोव्ज केतकीने दिले होतेच. केतकी म्हणजे आमच्याकडे गंधाली म्हणून एक मुलगी राहते तिची मैत्रीण. ती कोरीयाहून आली त्यावेळी येताना ग्लोव्ज घेउन आली होती. तिने तर जॅकेट पण आणले होते. पण ते जॅकेट तिच्या मापाचे होते. ते मला बसेना. मग जॅकेटचा विचार रद्द केला, कारण जॅकेट काठमांडूला गेल्यावर आयोजकांतर्फे परत करण्याच्या बोलीवर मिळणारच होते. बारीकसारीक गोष्टी जमा करतच होतो. अजून वेळ आहे असे म्हणत म्हणत तयारी चालू होती. हळू हळू जायचा दिवस जवळ येत चालला तसतसे माझे टेन्शन वाढायला लागले होते. काय काय न्यायचे याचाही गोंधळ वाढतच होता. अखेर "इन सर्च"ने दिलेल्या यादीप्रमाणे सर्व सामान जमा केले. अनुने बॅग भरून दिल्या. यादीप्रमाणे सर्व काही घेतले होते. सन स्क्रीन लोशन, कोल्ड क्रीम, हॅंड वॉश, टिश्यु पेपर रोल, बेबी वाईप्स, थर्मल वेअर, लिप जेल वगैरे वस्तू ज्या कधी आयुष्यात वापरलेल्या नव्हत्या त्या उत्साहाने जाऊन आणल्या. मला स्वत:ला मी यातले किती आणि काय काय वापरेन त्याची शंकाच होती. पण यादीत दिले होते आणि तुम्ही आणले नाही असे व्हायला नको म्हणून, मी वापरणार नाही याची खात्री असतानाही ते सर्व घेतले. माझी सर्व डायबेटीसची आणि इतर सर्व सामान्य औषधे व्यवस्थीतपणे १७/१८ दिवसाला किती लागतील त्या प्रमाणे मोजून घेतली. डायबेटीसची औषधे अगदी इमानदारीत पहीले दोन तीन दिवस नियमीतपणे घेतली. नंतर प्रवासाचा आणि जेवणा खाण्याचा अनियमीतपणा यात डायबेटीसची औषधे बंद पडली. सर्दीकरताची औषधे मधे कधीतरी वापरावी लागली. पण नाहीतर औषधे वापरली नाहीत हा भाग वेगळा म्हणा!! खाण्याच्या वस्तूही जमा करून घेतल्या होत्या. चितळे बाकरवडी, सुका मेवा, गोळ्या, खजूर, लाडू वगैरे वस्तू घेतल्या होत्या. माझी मैत्रीण मंजूने अतिशय प्रेमाने बेसनचे लाडू दिले होते. काय काय नेऊ बरोबर? काही सुधरत नव्हते.
खरं तर सौ.ची खूप आठवण येत होती. इतक्या मोठ्या प्रवासाला मी एकटा कधीच गेलो नव्हतो ना? त्यातून चीनसारख्या मैत्रभावाचा आभाव असलेल्या देशात जायचे होते. त्याचेही टेन्शन आले होते. त्यामुळे वारंवार सौ. ची आठवण येत होती. सौ. ची आठवण हा थोडासा स्वार्थी विचार होता का? माझे मलाच कळत नव्हते. माझे एक मन म्हणत होते की "लेका, आता सामान बरोबर काय काय घ्यायचे आणि त्याची तयारी करायच्यावेळी तुझी पंचाईत आली म्हणून तुला आता तिची आठवण झाली होय रे? इतर वेळी ती माऊली तुझ्यासाठी झिजत होती, खस्ता काढत होती, तुझ्या पाठीशी भरभक्कमपणे उभी होती ते नाही आठवले तुला? एखाद्या व्यक्तीची किंमत ती गेल्यावरच कळते. मित्रा, फार फार स्वार्थी आहेस रे तू!" मला माझ्याच मनाने असे सॉलिड फटकारल्यानंतर माझा काही इलाज नव्हता. मुकाट्याने स्वतःची स्वतः आणि अनुची मदत घेऊन तयारी सुरू ठेवली. पावसाची शक्यता गृहित धरून एक "पाँचो" नावाचा पावसाळी डगला आणला. सामान कोरडे राहण्याच्या दृष्टीने बरोबर प्लॅस्टीकच्या पिशव्या घेतल्या होत्याच.
सर्व व्यवस्थित पॅक केले होते. प्रत्येक कप्प्यात काय काय भरलय याची यादी तिथे चिकटवली होती. इतका व्यवस्थितपणा किती दिवस टिकणार होता कोणास ठाउक!! कारण पुढे हा व्यवस्थितपणा चार एक दिवसातच पार कोलमडला. आणि या सगळ्या व्यवस्थितपणावर माझ्या अव्यवस्थितपणाचा कळस म्हणजे बॅगांवर मी माझे नांवच टाकले नव्हते. इतर सगळ्यांच्या बॅगांवर व्यवस्थित नांवे आणि नांवांची लेबले लावलेली पाहून मला माझ्या ढिसाळपणाची लाजच वाटली. आणि शेवटी "पितळी कुलूप असलेल्या माझ्या बॅगा" इतक्या तळागाळापर्यंत बॅगांच्या आयडेंटीफिकेशनची पातळी येऊन पोहोचली. ट्रीप संपेपर्यंत मी त्या पितळी कुलूपांच्या किंवा कधी हॉटेलमधे खोली मिळताना खोलीचा क्रमांक खडूने टाकलेला असायचा, त्या क्रमांकाच्या सहाय्याने मी माझ्या बॅगा शोधत असे. अगदी पुण्यात घरी उतरताना सुद्धा "पितळी कुलुप" वाली माझी बॅग असे चालले होते.

यात्रेवर जायचा निर्णय घेतला तेंव्हाची आत्मविश्वासाची पातळी आता खूपच कमी झाली होती. आणि निघायच्या वेळेपर्यंत तर आत्मविश्वास पार रसातळाला पोहोचला होता. काय करावे कळेना. माझ्याकडे पाहून कुणाला जाणवले नसेल कदचित. पण मी मनातून खूपच अस्वस्थ होतो. अनु, माझ्या मानलेल्या बहिणी, नाती, मुली, मित्र, मैत्रीणी मला सतत प्रोत्साहन देत होत्या. मला मुलीसारखी असलेली डोंबीवलीची अमीता चक्रदेव मला सतत म्हणत असे की, "आबा, तुम्ही मुळीच काळजी करू नका. मी तुम्हाला रेकी पाठवते." मी तिला बोललो होतो की २८, २९ आणि ३० हे सगळ्यात महत्त्वाचे दिवस आहेत. कारण या दिवशी कैलास पर्वताची परिक्रमा करायची होती ना. ती म्हणाली की "मी तुम्हाला या दिवशी नक्की रेकी पाठवते. तुम्हाला काहीही त्रास होणार नाही. आबा, तुम्ही मुळीच काळजी नका करू. सगळे व्यवस्थीत होईल. तुम्हाला परिक्रमेच्या दिवशी काहीही त्रास जाणवणार सुद्धा नाही. अगदी सहज एक गावात चक्कर टाकल्याप्रमाणे तुमची परिक्रमा अगदी आरामात होईल. आपण परीक्रमा कधी केली ते कळणार सुद्धा नाही बघा." मी माझा आत्मविश्वास इथे गमावण्याच्या मार्गावर होतो आणि अमिताला माझ्याबद्दल भलताच जबर विश्वास होता!!! कशाच्या जोरावर? मला एक कळत नव्हते की मी स्वतः सोडून सगळ्यांना माझ्याबद्दल इतका विश्वास का होता? सर्वच जण म्हणत होते की सर्व काही ठीक होईल. पण त्यातला पोकळपणा माझा मलाच जाणवत होता. कारण मला ठाऊक होतं की सर्व मलाच झेलायचय. परिक्रमा मी कोणाच्या खांद्यावर बसून थोडीच करणार होतो? मला माझ्या पायावरच चालायचे होते ना शेवटी!!! मग ही सर्व मंडळी कशाच्या जोरावर हे म्हणत होती? की माझे मनोधैर्य ढासळू न देण्याचा हा एक केविलवाणा प्रयत्न होता? मी अनामिक अस्वस्थ होतो खरा!!!

१८ जुलैला निघण्याच्या दिवशी रात्री सर्वात आधी मुंबईच्या एका बहीणीचा फोन आला. तिने तिच्यापरीने मला धीर देण्याचा प्रयत्न केला. जवळ जवळ १५/२० मिनीटे ती बोलली. मी या पूर्वी जेंव्हा तिला जेंव्हा सांगितले होते कि मला फार टेन्शन आलय तेंव्हापासून ती नेहमीच म्हणायची की *"अरे, एक तर तुला कॉन्फिडन्स नव्हता तर यात पडायचेच नाही. बरं आता पडला आहेस ना?. मग हे तुला कसे पार पाडता येईल याचा विचार कर आणि त्याप्रमाणे नीट तयारी कर."* त्यावेळी मी तिला म्हणालो होतो की, *"अगं, मी ही यात्रा ठरवली त्यावेळी मला जबर आत्मविश्वास होता. पण आता जायचा दिवस जवळ येतोय तसतसे मला फार टेन्शन यायला लागलय गं!!!"* आणि आता आज तिचा फोन आला तेंव्हा ती म्हणाली, *"अरे दादा, तुझे टेन्शन गेले का? पण जाऊ दे. ते जाणार नाहिये. मला माहित आहे. आता मागे फिरणे शक्य नाहीये, तर मग नीट निभावून ने सर्व. तुला माझ्या मनापासून शुभेच्छा. तू सर्व नक्की निभावून नेशील. मला खात्री आहे. तू काहीही काळजी करू नकोस. सर्व व्यवस्थित होणार आहे. तू तसा व्यवस्थित आहेस. मला माहीत आहे रे. पण काळजी नको करूस. नीट जा. सगळे व्यवस्थित घेतलेस ना?"* असो.

नंतर माझी लाडकी नात अद्विका हिचा १० वाजता फोन झाला. नेहमीप्रमाणे ती बोलली. खळखळत वाहणाऱ्या झऱ्याच्या स्वच्छ पाण्यासारखे तिचे बोलणे म्हणजे तुमचे टेन्शन पूर्णपणे काढून टाकणारे असते. मी मागे म्हटल्याप्रमाणे एखाद्या मंद वाऱ्याच्या झुळुकीसारखे. कडाक्याच्या उन्हाळ्यानंतर झाडाला पहिल्या पावसाचे पाणी मिळावे ना तसे. खूप उंचीवर असताना अतोनात दम लागल्यावर ऑक्सीजनचा सिलेंडर लावावा तसे मला नेहमीच अद्विकाशी बोलल्यावर वाटते. या मुलीशी बोलत असताना दु:खाला नेहमीच "नो एंट्री" असते. (या माझ्या मानलेल्या पण अतिशय लाडक्या नातीवर मी "निर्झरी" हा लेख लिहीला आहे. माझ्या ब्लॉगवर तो वाचायला मिळेल. माझ्या ब्लॉगचा पत्ता : shreerampendse.blogspot.com). तिने मला यात्रा सफल होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्या शुभेच्छांनी माझे मनोधैर्य थोडेसे वर आले.

मग माझा खास आणि एकमेव मित्र नंदू दाभोळकर आणि त्याची बायको रजनी मला निरोप द्यायला आले होते. एअरपोर्टवर सुरक्षा चाळणीतून जाताना आणि विमानात बसताना काय काय काळजी घ्यायची याच्या सूचना त्यांनी दिल्या. कारण त्यांना अमेरिकेला दोन वेळा जाऊन आल्यामुळे आंतरराष्ट्रीय प्रवासाचा अनुभव होता. त्यांची एक सूचना मी फारशी गंभीरपणे घेतली नाही. आमच्यातले एक सहप्रवासी परांजपेकाका यांनी पण डॉकनी दिलेली एक सूचना गांभिर्याने घेतली नाही. त्यामुळे काय झाले ते पुढे येईलच. तसे गंभीर काहीच झाले नाही. पण अश्या खडतर आणि महत्त्वाच्या प्रवासात अगदी किरकोळ किरकोळ वाटणाऱ्या पण बारीक सारीक गोष्टींना किती महत्त्व असते हे मी त्यातून शिकलो. नंतर त्याचा परत येताना काठमांडू विमानतळावर उपयोग होणार होता.

सगळ्यात शेवटी माझी अतिशय जिवलग, लाडकी आणि एकमेव सख्खी मैत्रीण रसिका उर्फ "सखी" हिने मुद्दाम मला धीर देण्यासाठी फोन केला. रात्री १०.३० वाजता तिचा फोन आला. आणि या फोनने तर मला ही परिक्रमा आपण अगदी सहजपणे पार पाडू असा आत्मविश्वास वाटायला लागला. फोन घेतल्या घेतल्या पटकन ती म्हणाली,

*"हरी ओम!! कोण बोलतय? श्री का?"*..........सखी

*"हॅलो, हो मीच बोलतोय. कोण बोलतय?"*............मी.

*"अरे, मी सखी. कमाल आहे? माझा आवाज नाही ओळखलास? मला विसरलास की काय?"*............सखी.

आज दिवसभर मी, ट्रीप कशी जाणार आणि आपल्याला झेपणार का, कसे होईल आपले, याच्या टेन्शनमधे होतो. त्यामुळे पटकन मला काही झेपलेच नाही. सखीचा आवाज ऐकल्यावर मात्र माझी ट्युब पेटली. शिवाय खरं तर मला हा फोन अजिबात अपेक्षित नव्हता ना!!! म्हणून मी गडबडलो आणि माझ्या पटकन लक्षात आले नाही.

*"अग तुला विसरणे कसे शक्य आहे? नाही विसरलो मी. आता निघणार ना? म्हणून जरा बधीर होतो. शिवाय खूप दिवसांनी बोलतो आहोत, म्हणून पटकन झेपलेच नाही मला. सखी बोल. मला प्रचंड आनंद झाला आहे."*.....मी

*"हो. मला ते तुझ्या आवाजावरूनच जाणवलय. श्री, माझ्या प्रिय मित्रा, कसा आहेस रे? श्री, अरे तू इतक्या लांब जातोयस ना? मला खूप काळजी वाटतीये. श्री, मी खूप अस्वस्थ आहे रे! "*..........आणि नंतर मला काहीही बोलायची संधी न देता सखी पुढे म्हणाली,

*"अरे, मला माहीत आहे की तू खूप टेन्शन घेतलयस. पण श्री, बिलकूल टेन्शन घेऊ नकोस. आता तासाभरात निघणार ना? नीट जा. तू स्वतःची काळजी घेशीलच याची मला खात्री आहे! आणि हो, श्री कुठेतरी धडपडू नकोस रे बाबा. मला माहीत आहे की तू खूप धडपड्या आहेस तो! नेहमी कुठेतरी धडपडतोस आणि लागून घेतोस. म्हणून तर मला तुझी खूप काळजी वाटतीये आणि मला हे पण माहीत आहे की तुझा धीर सुटला असेल. श्री, मला तुझा स्वभाव पक्का माहीत आहे. तू भरपूर टेन्शन घेणार हे मला चांगलेच ठाउक आहे. म्हणूनच तर मी तुला आता निघताना मुद्दाम फोन केलाय. तुला धीर देण्यासाठी. तुझे मनोबळ वाढण्यासाठी. तू बिलकुल काळजी करू नकोस. हे बघ श्री, तू चांगल्या, स्वच्छ, शुद्ध मनाने आणि कोणतीही अपेक्षा न धरता जातोयस ना? मग सदगुरू तुझ्या पाठीशी आहेत बघ. तुला सद्गुरुंचे आशीर्वाद आहेत. हे बघ तुला नक्की परमेश्वराचे पाठबळ मिळेल. मला पक्की खात्री आहे. तू अगदी निःशंक मनाने जा. सगळे काही ठीक होईल. टेन्शन घेऊ नकोस. यात्रा एंजॉय कर. तुला काहीही होणार नाहीये. तू व्यवस्थीत येणार आहेस. तुझी यात्रा अगदी सफल होणार आहे. हा माझा शब्द आहे बघ."*..........राजधानी एक्सप्रेससारखी सखी सुटलीच होती.

*"अग सखी, तू मुळीच काळजी करू नकोस. मी नीट काळजी घेईन. नीट धड आणि वन पीस परत येईन. डोंट वरी. आणि आल्यावर आपण बोलूयाच."*..........मी

*"आणि हो! तू जे जातोयस ना, याला यात्रा असे नाव असले तरी ट्रीप एन्जॉय कर. बघ एखादी पोरगी पटव! तेव्हढीच तुझी ट्रीप मस्त जाईल रे!"*..........सखी.

व्वा! काय भारी बाई आहे ही! एकीकडे मला सद्गुरूचे पाठबळ देते आणि एकीकडे पोरगी पटवायला सांगते!!! अगदी बिनधास्त आणि अफाट!!! अस्सल हाडाची गोवेनीज आहे ना ती!!! पण हे सर्व माहित असूनही मला आत्ता सॉलीड घाम फुटला. बापरे!!! मी जातोय कुठे? ही सांगतेय काय? डोळ्यासमोर काजवे चमकले हो! मी तिथे एकटा होतो तरी पटकन आजूबाजूला पाहून घेतले की कोणी ऐकत नाहीये ना!!! पण नंतर माझाच सरदारजीपणा मला ध्यानात आला की अरे आपण फोनवर बोलतो आहोत. कोणी कसे ऐकेल?

*"अग सखी काय बोलते आहेस तू यार!!! अग माझं वय आहे का आता पोरी पटवण्याचं? आणि तिथे हिमालयात रूक्ष प्रदेशात कुठे पोरी सापडणार?"*..........मी.

खरं तर आता ही वेळ होती मी आजूबाजूला बघण्याची. माझ्या तोंडून पटकन निघून गेले आणि मग मात्र मी इकडे तिकडे चमकून पाहीले. हुश्श!!! कोणाचे ही माझ्याकडे लक्ष नव्हते.

*"अरे श्री, हे बघ पोरगी पटवायला वयाची काही अट नसते बरं का रे!! दोस्ता, देव धर्म तर होईलच. कारण तू त्यासाठीच तर चालला आहेस ना? हे बघ, हे पुण्यकर्म व्हावं म्हणून तर तुला परमेश्वराने या यात्रेला जायची प्रेरणा दिली आहे. आणि परमेश्वराने तुला प्रेरणा दिली आहे म्हणजे मग तो तुझी नक्की काळजी घेईलच! खात्री आहे मला! पण अरे थोडी मजा पण करून ये! बघ एखादी मस्त तिबेटीयन किंवा नेपाळी पोरगी पटव रे! जा जाऊन ये. मस्त मजा कर. श्री, माझ्या दोस्ता, मी तुझी वाट बघतीये. काळजी घे. जपून जा. तुला माझ्या लाख लाख शुभेच्छा."*..........सखी

मुळीच अपेक्षा नसताना, तिचा आवर्जून फोन आला याचेच मला अप्रूप होते. मला खूप बरे वाटत होते, अफाट आनंद झाला होता. आणि डोळे पाणावलेले होते. बाहेर गच्चीत उभा राहून बोलत होतो. समोर कोणीही नव्हते. त्यामुळे, मला जोरात वारं सुटल्यामुळे डोळ्यात काहीतरी गेल्याचा अभिनय करण्याची वेळ आली नाही. एखादा शुभशकुन असावा तसा सखीचा फोन होता का? की सखीला पुढच्या काही संकटांची चाहूल लागली होती? आणि म्हणूनच ती अस्वस्थ होती का? काही कळत नव्हते. पण तिच्या या शब्दातली कळकळ मात्र माझ्या मनाला कुठेतरी भिडली. तिच्या शब्दातल्या आत्मविश्वासपूर्ण स्वराने माझे टेन्शन मात्र कमी व्हायला लागले होते. केव्हढी माया होती तिची माझ्यावर, केव्हढा विश्वास होता तिचा? तिच्या एक शतांशाने जरी माझा माझ्यावर विश्वास असता ना तरी सुद्धा माझा मनावरचा ताण कमी झाला असता. तिच्या या मायेच्या शब्दांनी माझे मनोधैर्य खूपच वरती आले हे मात्र खरे.
११.१० झाले होते. आणि माझा फोन वाजला. जयंती बोलत होती. *"आम्ही कोठारी शो रूमजवळ आलो आहोत. आता कसे यायचे?"* मी आमच्या गाडीला घरापर्यंत यायच्या सूचना दिल्या. देवापुढे दिवा लावला, नमस्कार केला. आणि जड जड पावलांनी जिना उतरू लागलो. पावले जड का झाली होती? माझे मलाच कळत नव्हते. एक प्रकारची अनामिक हुरहूर लागली होती हे मात्र खरे. अनु, अद्वैत, आभा खालपर्यंत पोहोचवायला आले होते. तसेच माणिक, श्रुतिका आणि गंधाली या आमच्याकडे राहणार्या मुली पण मला निरोप देण्यासाठी खालपर्यंत आल्या होत्या. या सर्व जणांच्या आणि सखी, अद्विका आणि इतर सुहृदांच्या प्रेमळ आणि मायेच्या शुभेच्छांचे गाठोडे, माझ्या दोन बॅगा आणि मी स्वतः असे गाडीत बसलो. शेवटच्या वर्षाच्या फायनल परीक्षेच्यावेळी अभ्यास नीट झाला नसेल तर, परीक्षा हॉलमधे पहिल्या पेपरला जाताना जशी छाती दडपते तसे काहीसे माझे झाले होते. सखीला म्हटल्याप्रमाणे 'वन पीस' आणि धड परत येणार ना? असली अनामिक हुरहूर मनात साठली होती. आणि या हुरहुरीमुळेच असेल कदाचीत पण शुभेच्छांचे गाठोडे आता अधिकच जड जड वाटायला लागले होते.

........क्रमशः

श्रीराम पेंडसे

# आरोग्य व दिनचर्या

# आरोग्यं धनसंपदा – भाग ४

मागच्या लेखात मी दिनचर्या आणि ऋतुचर्या यावर लिहिले होते. त्यात आपण आजच्या युगास पोषक दिनचर्या कशी असावी हे पाहिले होते. आजच्या लेखात मानवी मन, त्याचा शरीराशी संबंध व त्या अनुशंगाने संपूर्ण स्वास्थ्यासाठी योगाभ्यास याचा विचार करू.

मी मागे म्हटल्याप्रमाणे मानवी मन ही अतिशय क्लिष्ट व समजण्यास अवघड गोष्ट आहे. माणसाच्या मनात काय विचारांची आंदोलने आहेत ते फक्त त्या व्यक्तिलाच समजेल. दुसऱ्या व्यक्तिला त्या व्यक्तिच्या चेहेऱ्यावरून, बोलण्याच्या पद्धतीवरून, लिहिण्याच्या पद्धतीवरून, अक्षराच्या वळणावरून, स्वाक्षरी करण्याच्या पद्धतीवरून मनातले विचार हे थोड्याफार प्रमाणात समजू शकतात. पण ते निश्चित नाही. ते म्हणजे हवामानखात्याच्या अंदाजासारखे आहे. मानवी मन एखाद्या बँकेच्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टसारखे आहे. तो व्हॉल्ट फक्त त्याच्या मालकालाच उघडता येतो. आणि त्यात काय आहे हे फक्त त्या मालकालाच माहित असते. बँकेच्या व्हॉल्टमधे प्रथम बँक किल्ली लावून पहिले कुलूप उघडते आणि नंतरच मग तो व्हॉल्ट फक्त मालकाच्या किल्लीनेच उघडतो. इथे तसे नाहीये. फार फार तर इतपत म्हणता येईल की इथे मानवी मनाच्या बाबतीत मनोविकारतज्ञ आपल्या ज्ञानाच्या व अनुभवाच्या किल्लीने तुमच्या मनाचे पहिले कुलूप उघडण्याचा प्रयत्न करतो. मी प्रयत्न अश्यासाठी म्हणतो कि ते मनाचे कुलूप उघडले जाईल याची खात्री नसते. अंधारात तीर मारण्यासारखे आहे ते. कारण काही व्यक्ती आपल्या मनाची दारे इतक्या घट्ट बंद करतात की कोणत्याही किल्लीने ती दारे उघडत नाहीत.

हे असं का होते? तर त्याला निश्चित कारणे नाहीत. ३+२=५ असे वैज्ञानिक गणिती उत्तर त्याला नाही. पुष्कळ कारणांचा एकत्रित परिणाम म्हणून एखादी व्यक्ती स्वतःभोवती एक अभेद्य भिंत बांधते. अनियमीत दिनचर्या, अनियमित आहार, जेवणाच्या अनियमित वेळा, विश्रांतीचा आभाव, कौटुंबिक समस्या, कामाचा ताण आणि त्यामुळे येणाऱ्या कार्यपद्धतीच्या समस्या अश्या अनेक कारणांनी मनाचे संतुलन बिघडते. त्या व्यक्तिची जडण घडण कशी आहे, स्वभाव कसा आहे, तो स्वभाव लहानपणापासून कसा आणि कोणत्या वातावरणात विकसित झाला आहे, त्यावर कोणते संस्कार झाले आहेत, कौटुंबिक वातावरण कसे आहे त्यावर त्याच्या मनोकोषाची जडण घडण, त्याची अभेद्यता अवलंबून आहे. निरोगी, निरामय, आनंदी व्यक्तिच्याबाबतीत हा मनोकोष, ही भिंत त्रासदायक ठरत नाही.

मागच्या लेखात मी म्हटलं होतं की शरीर हे वस्तूरूप आहे. पण मन मात्र तसे नाही. ते वस्तूरूप नाही. त्याला आकार नाही. जडत्व नाही. ती एक उर्जा आहे. पंचेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये ही भौतिक आहेत. त्यांच्या संरचनेत अडथळा आला की शारीरीक व्याधि निर्माण होतात. व्याधी हे 'विघटन' या शब्दाचे रूप आहे. आणि या संरचनेत बदल होण्याची पूर्वसूचना मनाला, चित्ताला मिळते. चित्त तुमच्या मेंदूत धोक्याची घंटा वाजवतं. पण आपण कामाच्यामागे आणि पैश्याच्या मागे पळण्याच्या नादात या धोक्याच्या सूचनेकडे दुर्लक्ष करतो. मग शारीरीक व्याधि, दुःख व त्यातून मानसिक अशांतता निर्माण होते.

मन ही एक उर्जा आहे. म्हणून ती प्रवाही आहे. तिचा निश्चित मार्ग आहे. योगशास्त्रात या उर्जेला 'चित्त' म्हणतात. आणि या उर्जेच्या नैसर्गिक संचाराला 'वृत्ति' म्हणतात. आणि या नैसर्गिक संचारात, त्याच्या मार्गात बाधा आली, अडथळा आला कि मग व्याधिची निर्मिती होते. ही वृत्ति म्हणजे उर्जेची नैसर्गिक ओढ. प्रत्येक ज्ञानेंद्रियाचे व कर्मेंद्रियाचे कार्य हे एक उर्जेवर चालते. त्या इंद्रियाची विशिष्ट विषयाकडे नैसर्गिक ओढ असते. जसे शब्द, स्पर्श, रस, रूप, गंध या विषयांकडे अनुक्रमे कान, त्वचा, जिभ, डोळे व नाक यांची नैसर्गिक ओढ आहे. मग तो विषय आणि इंद्रिय याबरोबर मन आले, सुख-दुःख या संवेदना आल्या. सुख ही अनुकूल आणि दुःख ही प्रतिकूल संवेदना आहे. आणि दुःख या संवेदनेमुळे व्याधी शरीरात आली हे जाणवते.

दुःख या संवेदनेची जाणिव त्या व्यक्तिला बऱ्याच आधी झालेली असते. डॉक्टरना ते जाणवेलच असे नाही. पण मनाला ती जाणिव मात्र होते. पण त्यातून मार्ग काढण्याची मनाची क्षमता नाही. ती क्षमता बुद्धिची आहे. सार-असार म्हणजे चांगले वाईट बुद्धिला समजतं. पण एकट्या बुद्धीचं ते काम नाही. मग यातून मार्ग काढण्यासाठी मन व बुद्धी एकमेकांशी समन्वीत झाल्या पाहीजे. एकत्र आल्या पाहिजेत. त्याला "चित्ताचे समत्व" म्हणतात. व्याधि ही मनोव्यथा या अवस्थेत असतानाच त्यावर वार झाला पाहिजे. म्हणजे व्याधि समूळ जाईल. आणि योगशास्त्राने हे शक्य आहे. यालाच योगशास्त्र "चित्तवृत्ती निरोध" असं म्हणतं.

आणि हा वृत्तीनिरोध, अभ्यास आणि वैराग्य याच्या सहाय्याने करता येईल असे महामुनी पतंजली म्हणतात. यातील वैराग्य क्षणभर बाजूला ठेवूया. कारण हा आपल्यासारख्या सामान्य माणसाच्या कक्षेतला विषय नाही. पण अभ्यास मात्र शक्य आहे. अभ्यास पुस्तकाच्या सहाय्यानेही करता येईल. पण मग ते फक्त शाब्दिक ज्ञान होईल. त्यात अनुभविक ज्ञान येणार नाही. जसे पुस्तके वाचून पोहता येणार नाही. किंवा पाकशास्त्रावरची पुस्तके वाचून केलेला पदार्थ त्याच्या चित्रात दाखवल्यासारखा होईल याची खात्री नसते. त्यापेक्षा तो भलताच निघतो. म्हणून तो पदार्थ किंवा पाककला जसे आईच्या मार्गदर्शनाखाली मुलींनी शिकणे गरजेचे आहे, तसा इथे गुरुपदेश आवश्यक आहे. गुरू असणे, प्रशिक्षक असणे गरजेचे आहे. माझे गुरुजी डॉ. करंदीकर उर्फ आचार्य योगानंद म्हणतात, "कोणत्याही आसनाचा अभ्यास हा पायरी पायरीने केला पाहिजे. एकदम १००% अवस्था प्राप्त होणार नाही. प्रथम शारीरिक अवस्था, नंतर शरीरांतर्गत होणाऱ्या बदलांची जाणिव, त्यातून होणारे मानसिक व बौद्धिक बदल आणि सर्वात शेवटी अनुभवाला येणारी "आनंदावस्था" असा हा कष्टसाध्य व दीर्घ प्रवास असला तरी यात यश निश्चित आहे. अशी अवस्था चांगल्यापैकी जमू लागली व जास्त वेळ टिकवता आली म्हणजे आपोआप वेगळे वृत्तिनिरोध अनुभवता येतात. शुद्धता, संतोष, तप आणि स्वाध्याय याही अवस्था अनुभवता येतात. प्रत्येक आसनात चालू असणाऱ्या श्वासावर चित्त ठेवून प्राणायाम ही साधतो आणि मन निर्विचार होवून कोणत्याही विषयोपभोगाची इच्छा मनात उरत नाही. श्रद्धा, निष्ठा ठेवून अनुष्ठानपूर्वक केलेला दीर्घ अभ्यास 'आसनजय' अवस्था प्राप्त करून देतो. महामुनी पतंजलीनी आसनजयाच्या व्याख्येत सांगितले आहे कि "ततो द्वंन्द्वानभिघातः॥" म्हणजे सुख-दुःख शीत-ऊष्ण अश्या द्वंद्वापासून वेगळे असलेले स्वास्थ्य अनुभवता येते. ही अवस्था अनुभवण्याची आहे. व म्हणुन ती "शब्दातीत" आहे."

म्हणुन आपण पांच सोप्या आसनांनी सुरूवात करणार आहोत. नेहमी योगासनाचा विचार करताना अमुक तमुक आसनाचा उपयोग काय याचे नेमके उत्तर देणे शक्य नसते. आसनांच्या बाबतीत जो परिणाम अपेक्षित आहे तो सर्वआसने किंवा त्या गटात असणाऱ्या आसनांचा एकत्रित परिणाम असतो हे लक्षात ठेवावे. त्यामुळे अमुक एखादे आसन कश्यासाठी आहे हे सांगणे अवघड आहे. ढोबळ मानाने सांगता येईल. पण नेमका परीणाम, ज्याला इंग्रजीत "पिन पॉइंट इफेक्ट" म्हणतात, तसे सांगणे कठिण आहे. कारण मी याच लेखात म्हटल्याप्रमाणे गणिती तत्त्व लागू पडणार नाही. पृथ्वीच्या पाठीवर कुठेही गेले तरी ३+२=५ हेच उत्तर येईल. पण एखाद्या आसनाचे तसे नाही. सुप्तवीरासनाचा उपयोग एखाद्या व्यक्तिला होईल पण तशाच प्रकारच्या व्याधिने त्रस्त असणाऱ्या दुसऱ्या व्यक्तिस त्याचा तितकाच उपयोग होईलच असे नाही. जरी आसन तेच असले, करण्याची पद्धत तीच असली तरीही.

ही पांच आसने म्हणजे सुप्तवीरासन, सुप्तबद्धकोनासन, विपरीत दंडासन, विपरीत करणी, आणि सेतुबंधसर्वांगासन. यासह शवासन केल्यास ही आसने मानसिक शांतता, स्वास्थ्य आणि शरीराला तसेच मनाला विश्रांती देतील. वरीलपैकी शवासनासह तीन आसने प्रत्येकी २० मिनीटे केल्यास मनाला आणि शरीराला आनंददायी विश्रांती मिळू शकेल. या पुढील लेखात वरील आसने करण्याच्या पद्धती, साहित्य व आसनांचा स्थूल मानाने परिणाम याचा विचार करू.

॥ ॐ तत्सत ॥
॥ जय श्रीराम ॥

श्रीराम पेंडसे

# दूध व दुग्धजन्य पदार्थ

गाईच्या दुधाखेरीज इतर सात प्रकार म्हणजे म्हैस, शेळी, मेंढी, उंटीण, हत्ती, घोडी आणि गाढवीणीचे दूध होय.म्हशीचे दूध वजन वाढवण्यास उपयुक्त आहे. कृश मानसाला झोप येत नसल्यास रात्री म्हशीचे दूध द्यावे.त्यामुळे उत्तम झोप लागते. शेळ्या कमी पाणी पितात. त्यांचा आहार कडू, तुरट, तिखट असा असतो. त्यांचे हिंडणे, फ़िरणे खूप. त्यामुळे त्यांचे दूध पचावयास हलके असते. क्षय, दमा, ताप, जुलाब, डोळ्यांचे विकार, रक्तपित्त व मधुमेह विकारात शेळीचे दूध मोठे टॉनिक आहे. तुलनेने मेंढ्याचे दूध कमी गुणाचे आहे. ते उष्ण असून वातविकारात उपयुक्त आहे.

उंटीणीचे दूध जलोदर, पोटफ़ुगी, मूळव्याध, शरीरावरील सूज या विकारात उपयुक्त आहे. शरीरास बळकटी आणण्यास हत्तीणीचे दूध उपयुक्त आहे. घोडी, गाढवी यांचे दूध हाता-पायांच्या विकारात उपयुक्त आहे.

शरीरात खूप रूक्षता असल्यास निरसे, न तापवलेले किंवा धारोष्ण दूध प्यावे. पोटात वायू धरण्याची खोड असणाऱ्यांनी दूध तापवून मगच प्यावे.

स्त्रीचे दूध डोळ्यांच्या वात, पित्त आणि रक्तदोष विकारात फ़ार उपयुक्त आहे. डोळ्यात चिपडे धरणे, चिकटा असणे, उजेड सहन न होणे याकरिता स्त्रीच्या दुधाचे थेंब डोळ्यात सोडावे.

**<u>दूध कोणी घेऊ नये?</u>**

नवीन आलेला ताप, वारंवार जुलाब होण्याची सवय, पोटात खुटखुटणे, कळ मारून मलप्रवृत्ती, अग्नीमांद्य, लघवीस अडथळा असणे, लघवी कमी होणे, मूतखडा, लहान बालकांचा दमा, खोकला व कफ़विकारात दूध हितकारक नाही. अजीर्ण, आमवात, वृद्ध माणसांचा रात्रीचा खोकला याविकारात दूध वर्ज्य करावे. कफ़ प्रकृती असणाऱ्यांनी किंवा संडासला खडा होण्याची सवय असणाऱ्यांनी रात्री दूध घेऊ नये.

काविळ किंवा टायफ़ॉईडचा ताप या विकारात औषधांचा गुण येत नसेल तर दूध किंवा दुधाचे पदार्थ लगेच बंद करावे. आराम मिळतो.

**<u>ताक :</u>**

इंद्रालासुद्धा हवेहवेसे वाटणारे ताक आजच्या सततच्या वाढत्या महागाईच्या दिवसांत अनेक विकारांवर उत्तम औषध आहे. योग्यप्रकारे तापविलेल्या दुधात किंचीत कोमट असताना नाममात्र विरजण लावल्यास उत्तम दर्जाचे मधुर चवीचे दही तयार होते. या दह्याचे आपल्या गरजेनुसार दाट, पातळ ताक तयार करता येते. औषधी गुण ताज्या ताकातच आहेत. दही खाण्याचा अतिरेक होऊन मूळव्याध, सूज, अजीर्ण, खाज, कंड, कफ़, दाह असे विकार उत्पन्न झाले तर त्यावर ताक हा उत्तम उताराच आहे. 'ताजे' किंचीत तुरट असलेले ताक सुंठेबरोबर घेतल्यास, हे कफ़ावरचे उत्तम औषध आहे. मूळव्याध हा भयंकर पीडा देणारा रोग केवळ ताक व ज्वारीची भाकरी खाऊन औषधाशिवाय बरा होऊ शकतो. मोड मुळातून नाहीसे होतात. ताक आंबट नको. पोटदुखी, अजिर्ण, अरूची, अपचन, उदरवात, जुलाब एव्हढेचकाय, पण पाश्चात्य वैद्यकाने असाध्य ठरवलेला ग्रहणी, संग्रहणी, आमांश हा विकार भरपूर ताक पिऊन बरा होऊ शकतो. ताक व तांदळाची भाकरी असा आहार ठेवला तर आमांश विकार नि:शेष बरा होईल.

खूप तहान लागणे, शेष या विकारात तसेच उन्हाळ्यात आणि ऑक्टोबर महिना या काळात सकाळी नियमितपणे ताक प्यावे. पावसाळ्यात सुंठचूरण किंवा मिरेपूड मिसळून ताक प्यावे. लघवी कमी होणे, लघवी लाल होणे, तिडिक मारणे, उपदंश विकार, एडस विकारात इंद्रियाचा दाह होणे, ओटीपोटात कळ मारणे, पक्वाशयात अन्न कुजणे, संडासल घाण वास मारणे, जंत, कृमी इत्यादी अपान वायूच्या तक्रारीत एक दिवस केवळ ताकावर राहवे. ताकाबरोबर चवीकरता आले, लसूण, सुंठ, मिरी, जिरे, मीठ वापरावे.

वृद्ध माणसांनी ताक सकाळी प्यावे. सायंकाळी पिऊ नये. कारण त्यांना खोकल्याचा त्रास हौ शकतो. पोटात वायू धरण्याची तक्रार असल्यास हिंग, लसूण, आले, जिरे, हिंगाष्टक चूर्ण असे पदार्थ प्रकृतिमानाप्रमाणे वापरावे. स्थूल व्यक्तींनी दुधाऐवजी ताक प्यावे. भरपूर लघवी होऊन वजन कमी व्हायला मदत होते. शरीरावरील फ़ाजिल सूज, पांथरी, गुल्म(ट्युमर), विषबाधा या विकारात ताक लगेच गुण देते.

**<u>ताक कोणी पिऊ नये?</u>**

सर्दी, पडसे, खोल;आ, नाक चोंदणे रात्री वारंवार लघवीकरिता उठणाऱ्यांनी किंवा अंथरूणात शू होत असल्यास व दमेकरी व्यक्तींनी ताक घेऊ नये. विशेषत: सायंकाळी व हिवाळ्यात थंड हवेत ताक वर्ज्य करावे. ज्यांना मुंग्या येतात, जे कृश आहेत, ज्यांचे रक्त कमी आहे, हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी आहे, ज्यांच्या पोटऱ्या दुखतात त्यांनी ताक वर्ज्य करावे. कान वाहत असल्यास संडासला खडा होत असल्यास ताक घेऊ नये.

**.............वैद्य खडीवाले**

# कविता

रूप सावळे सुंदर
मन भरते आनंदाने
नाचती पावुले आपोआप
टाळ मृदुंगाच्या गोड रवाने.......

रूप सावळे सुंदर
थकवा नसे रे,तुझ्या कृपेने ......

रूप सावळे सुंदर
समाधान दिसे चेहऱ्याने
हर्ष तो मावेना अंतरात
मग धावे पंढरीच्या दिशेने ........
खुलतो चेहरा दर्शनाने
चालतो वारी  दिनरात

**...देव पेडणेकर (१४/०६/२०१२..१७.३५)**



# ...आलो शरण तुला ....

आलो शरण तुला आम्ही आज भगवंता
कृपा-दृष्टी असावी या पामरांवरी अनंता............

अज्ञान बालके झाल्या त्या चुका
पायाखाली त्या घालून माफ करा
नकळत असे कृत्य घडले आता
हस्थ ठेवा सदैव मस्तकी अमुच्या
कृपा-दृष्टी असावी या पामरांवरी अनंता............

कर्म ते अमुचे आम्हा पसीच ठेवा
आशीर्वाद असोत आम्हावरी सदा
रूप-रंग नको पाहू ,दृष्टी गोड ठेवा
मागणे हेच अमुचे देवा तुझ पाया
कृपा-दृष्टी असावी या पामरांवरी अनंता............

स्वरूप ते तुझे अगाध कृपा करा
वाट दावा आम्ही जातो त्या गावा
स्मरत राहू तुझे सतत नाम देवा
गावू तुला आम्ही कर्म करता सदा
कृपा-दृष्टी असावी या पामरांवरी अनंता............

आलो शरण तुला आम्ही आज भगवंता
कृपा-दृष्टी असावी या पामरांवरी अनंता.....




**....देव पेडणेकर.(२३/०६/२०११).**

…पांडुरंग माझा ……

रूप सावळे सुंदर मनोहारी पांडुरंग माझा
भजनी रंगुनी,मनी आनंदी,भक्त दंग झाला
नाम मुखी घेवुनी, भक्तीत रंगला तो मेळा
भक्तीचा महापूर चंद्रभागेतीरी झाला गोळा
भाव भक्तीचा तू भुकेला पांडुरंग माझा……..

ना गरीब ना श्रीमंत न्याय तुझा न्यारा
उघडे हस्थ,भरपूर देई, भाव मनी सारा
अपार दृष्टी,पामरांसाठी धावत तू आला
चंद्रभागेतीरी भक्तांसाठी समय देई सारा
भाव भक्तीचा तू भुकेला पांडुरंग माझा….



फ़ोटो ग्राफ़ी – अनिकेत समुद्र

वैष्णवांचा मोठाला मेळा नाचतो ते बघा
दिंड्या-पताका घेवूनी अभंग मुखी गाथा
तल्लीन होई फेर घेई गोल रिंगण झाला
नादब्रःम्ह टाळ चिपळी एक झाले आता
भाव भक्तीचा तू भुकेला पांडुरंग माझा…….
विटेवरी तो भक्तांसाठी तिष्ठत राही ताठा

हाथ कटेवरी ठेवुनी तेजस्वी माझा राजा
नको भरजरी वस्त्रे नको अलंकार साजा
तुळशी पर्णांचा तो हार देई कंठी शोभा
भाव भक्तीचा तू भुकेला पांडुरंग माझा……

नाम्याची ती खीर मनसोक्त जेवुनी गेला
उठला सुटला गोरयाची गुरे राखाया गेला
आरोप असता धावला दामाजीच्या घरा
जसा पुतळा स्थिर पुंडलिका समोर उभा
भाव भक्तीचा तू भुकेला पांडुरंग माझा……



फ़ोटो ग्राफ़ी – अनिकेत समुद्र

**देव पेडणेकर(२१/०५/२०११)**



## !! तुझीच भक्ती !!

तुझीच भक्ती
तुझीच सेवा
नित्य घडो देवा
तुझ्याच पायी लीन होवू दे मजला ......

तुझीच शक्ती
तुझीच माया
सदा राहो बापा
तुझ्याच ठाई विलीन होवू दे मजला .......

तुझीच सक्ती
तुझीच दया
आम्हा लाभो राया
तुझ्याच चरणी वीट होवू दे मजला .........

....देव पेडणेकर




## पंढरीच्या पाटला

विठ्ठला पंढरीच्या पाटला
घाटा या वारी
आलो मी द्वारी
छंद तुझा मला

विठ्ठला पंढरीच्या पाटला
भेटला खरा गुरु भेटला
जय पांडुरंग होऊ निया दंग
लागो तुझा ळला

## --निलेश रटाटे

## पंढरीचा राणा...




पंढरीचा राणा
सावळा हरी
करुणा करी
भक्तांवरी...

भजनी दंग
गाती अभंग
संत संग
पंढरीला...

नामाचा गजर
वैष्णवांचा मेला
भक्तांनी केला
जयघोष...

मुक्ताईची ओवी
तुकोबांचे अभंग
टाळ मृदुंग
निनादले...

## ---नितीन----

## अनाम कविता

त्या अनाम कवितेसाठी
कितीदा बरे झुरावे
अनेक कविता असतील
का इतके अधिर व्हावे

दुर वनात फ़िरते शिळ
लाघवी गातो कोकिळ
अन एक कविता उमटे
उकलून आठव पिळ

का थांबायचे तेव्हा
खेळण्या शब्द गोफ़णी
अंधार सावल्या विरुनी
का करु नये बांधणी

चाहुल ऋतूची येता
काहुर आतले सुटले
उंब-यात अडले पाऊल
सावरताना तेही झटले

## सप्तपदी

सात पावले चालत आले, उंब-यातून आत
पदर खोचला तेव्हापासून मी न शिरले "आत"

जसे दिसाचे जाते फ़िरते तसेच माझे फ़िरणे
चक्र लाऊनी पायामध्ये मी न टाकली "कात"

घरी गलबला असे राबता जसे लग्नाचा जथ्था
दोन करांनी ना विझु दिली देव्हा-यातील "ज्योत"

रक्त शिंपुनी जगवल्या हिरव्या हिरव्या बागा
रुजते गेले रुजवत जाईल जरी जन्म हे सात

काळजाचे तुकडे करुनी , गिरवले संस्काराचे पाठ
जरा विसावा घे लाडके, कोण कुजबुजे कानात

नकोच आता पुन्हा विसावा ,अन विद्रोही मात
माझी मला अशीच आवडे ,मी गवताचीच पात

## कल्पी

# पुष्परचना – भाग ३

# पुष्परचना

## ( लेख क्र. ३)

पावसाळा सुरू झालाय , उन्हाळ्यात रखरखीत झालेली सृष्टी तजेलदार आणि टवटवीत होऊ लागली आहे. निसर्गाच्या या मनोहारी रुपाशी मैत्री व्हावी म्हणूनच आपल्याकडे या ऋतूत अनेक सण, व्रत- वैकल्य केली जातात. आणि त्यावेळी फुला- पानांना , सजावटीला विशेष महत्व असते. या ऋतूत येणारी फुलं, पानं आवर्जून वापरली जातात. या काळात पुष्परचनांकरीताही अनेक प्रकारची तजेलदार पुष्पसामग्री मिळते.
पुष्परचनांमध्ये विशेषतः इकेबानामध्ये फ़ांद्या आणि पानांना फुलां इतकेच महत्व असते. आपल्याकडे सर्वत्र आढळणारी सदाफुली, अबोली, कोरांटी, जास्वंद,कण्हेर, तगर,मोगरा, अनंत या सारख्या फुलझाडांच्या फ़ांद्या तसेच जाई, जुई, कुंद अशा वेली, लिंबू, करवंद, चिकू, डाळींब अशा लहान पानांच्या फ़ळझाडांच्या डौलदार फ़ांद्या रचनांमध्ये सुंदर दिसतात. पावसाळ्यात अशा फ़ांद्या मुबलक मिळत असल्याने रचनांमध्ये फ़ांद्यांचा वापर आवर्जून केला जातो.

भारतात बहुतेक ठिकाणी सर्व ऋतूत पुष्परचनांकरीता काही ना काही फुलं, पानं मिळू शकतात. परंतु अनेक देशात तीव्र उन्हाळा, हिवाळयामुळे पाने फुले गळून किंवा जळून जातात, त्यामुळे ताजी फुले, पाने दुर्मिळ व महाग होतात. अशा वेळेस वाळविलेली, नैसर्गिकरित्या वाळलेली पुष्पसामग्री वापरून सजावट केली जाते. अशी शुष्क पुष्पसामग्री dry material या नावाने लोकप्रिय आहे. त्यात फुलं, पानं, फ़ांद्या, कणसं, गवत, वेलींचे वेटोळे, पाइनसारख्या झाडांचे cones, शेंगा, लोंब्या अशा अनेक प्रकारांचा समावेश आहे.




*ज्वारीची बाकदार कणसं*
*आणि ऍन्थुरिअमचे फ़ूल.*




*सायकसची आकार दिलेली पाने आणि*
*गुलावाची फुले*

फुलं टिकवायची आणि त्यांचा उपयोग सुशोभनासाठी करण्याची कल्पना आपल्याकडे पूर्वीपासून प्रचलीत होती. काचेच्या बाटलीत तुरटीचे पाणी घालून त्यात सोनचाफ़्याची फुलं भरून ठेवली जातं. ही फुलं अनेक वर्ष टिकतात. बकुळीच्या फुलांचा रंग आणि सुगंधही फुले वाळल्यावर तसाच रहात असल्याने त्यांचाही उपयोग केला जाई. आता नविन नविन फुलं. पानं उपलब्ध आहेत ती टिकविण्यासाठी अनेक पद्धती वापरल्या जातात. त्यामुळे वैविध्यपूर्ण सामग्री उपलब्ध होते.

नैसर्गिक, रंगविलेले Dry material वापरून केलेल्या Dry arrangements सध्या लोकप्रिय आहेत. ताज्या फुलांच्या रचनांपेक्षा या जास्त काळ टिकतात. त्याच सामग्रीतून वेगवेगळया रचनाही करता येतात
.
रचनांमध्ये dry material बरोबर ताज्या फुलांचा उपयोग करून वेगळेपणा आणता येतो. अशाच काही रचनांची छायाचित्रे या लेखात दिली आहेत.




*Driftwood, Ixora चा गुच्छ आणि वाळलेलं गवत*

काही वेळा वठलेल्या झाडांच्या फ़ांद्या, मुळं, खोडं याचे सुरेख आकार तयार झालेले दिसतात. असे लाकूडDrift wood / काष्ठशिल्प म्हणून ओळखले जाते. झाडाच्या वाळलेल्या भागाना आवश्यक वाटल्यास थोडा आकार देऊन, polish paperने घासून गुळगुळीतपणा आणला जातो. त्याला Varnish किंवा नैसर्गिक रंग देऊन सुबक आणि टिकाऊ शोभिवंत वस्तू तयार होते.
Drift wood आणि ताज्या फुला-पानांचा एकत्रीत उपयोग करून नाविन्यपूर्ण रचना करता येतात.




*Drift wood, हेलेकोनिअम, गुलाबाची फुलेआणि पाने*

निसर्ग आपल्याला भरभरून देत असतो. या बहारदार खजिन्याचा उपयोग मात्र आपण कौशल्याने करायला हवा.

- सरोज जोशी

# खाद्यसंस्कृती

उपवास म्हणले की एकादशी अन दुप्पट खाशी असा प्रकार होतोच. रोज चार घास कमी खाऊ पण उपवास म्हणले की बरेच पदार्थ आपल्या डोळ्यासमोर तरंगतातना दिसतात. अन त्यामुळेच की काय आपल्या या गृहिणी मैत्रिणी इथे रेसिपी देण्याबाबतीत पण काही माहे नाहीत बरे... चला तर यांच्या रेसिपी पाहुन आपणही काही पदार्थ करुन पाहुन आस्वाद घेउ...

## उपवासाचे बटाटेवडे

*साहित्य :-* उकडलेले बटाटे ३ ते ४, चार - पाच हिरव्या मिरच्या, थोडे लाल तिखट, एक छोटा आल्याचा तुकडा, वरई पिठ एक वाटी, शाबूदाणा पिठ पाव वाटी, बेकिंग सोडा, चवीनुसार मीठ, तळणीसाठी रीफ़ाईंड तेल किंवा तूप.

*कृती:-* प्रथम उकडलेले बटाटे हाताने मॅश करून घ्यावेत. हिरवी मिरची, आलं मिक्सरमध्ये वाटून घ्यावं. तेलावर हे वाटलेलं आलं, मिरची थोडसं परतून घ्यावं. मॅश केलेला बटाटा घालावा व लगेचच आच बंद करावी. नंतर हे सर्व एकत्र करुन या मिश्रणाचा छान गोळा करून घ्यावा मग वरई पिठ व शाबूदाणा पिठ व लाल तिखट, सोडा,व मीठ हे सर्व एकत्र करावं. थोडं थोडं पाणी घालत गुठळ्या होणार नाहीत अशा प्रकारे थोडं दाटसर पीठ बनवून घ्यावं. बटाट्याच्या मिश्रणाचे लहान मोठ्या आकाराचे गोळे करून घ्यावेत. एका कढईमध्ये तेल तापवून घ्यावं. आच माध्यमच ठेवावी. बटाट्याचा एक गोळा पिठाच्या मिश्रणात घोळवून तेलात सोडवा व छान खुसखुशीत वडे तळून घ्यावेत. नारळाच्या चटणीसोबत गरम गरम सर्व्ह करावेत.



## रताळ्याचे गुलाबजाम

**साहित्य :-** दोन रताळी, साखर दीड वाटी, तळण्यासाठी तूप, चिमूटभर खायचा सोडा, साबुदाणा पीठ दोन  चमचे. वेलची पूड

**कृती :-** रताळी उकडून सोलून घ्यावी आणि चांगली कुस्करून त्यात साबुदाणा पीठ घालून ते मळून घ्यावे. या मिश्रणात वेलची पूड  व चिमूटभर खायचा सोडा घालून लहान गोळे करून घ्यावे. कढईत तूप तापवून घ्यावे. त्यात मंद आचेवर हे गुलाबजाम सोनेरी रंगावर तळून घ्यावे. नंतर साखरेचा एकतारी पाक करून त्यात हे तळलेले गुलाबजाम सोडावे चार पाच तास हे गुलाबजाम पाकात मुरु द्यावे.

टीप -- सजावटीसाठी त्यावर काजू -बदाम  बारीक काप पेरावे.

## उपवासाची जिलेबी

साहित्य : बटाटे, तूप, साखर, केशर, शाबूदाणा पिठ.

कृती: बटाटे घेऊन ते उकडुन, कुस्करुन घ्यावेत. एक वाटी गोळ्यास पाव वाटी शाबूदाणा पिठ घेऊन, त्या गोळ्यात तूप घालून गोळा चांगला मळावा. नंतर गोळ्याच्या दीडपट साखर घेऊन, त्याचा दोन तारी पाक करून, त्यात केशर घालावे. वरील बटाट्याचा गोळा जाड कापडाच्या कोन मध्ये  घालून,जिलब्या पाडा व तांबूस रंगावर तळा व  पाकात सोडा. ही बटाट्याची जिलबी कुरकुरीत व छान लागते.

## उपवासाचा  ढोकळा -

साहित्य: एक कप वर्याचे तांदूळ पिठ. दोन चमचे शाबूदाणा पिठ एक कप पातळ ताक दोन लहान चमचे साखर अर्धा चमचा मिरची पेस्ट अर्धा चमचा आले पेस्ट दोन लहान चमचे इनो एक चमचा लिंबाचा रस एक चमचा तेल रिफ़ाइंड चवीपुरते मिठ

फोडणीसाठी: दोन चमचा तेल, जिरे, दोन हिरव्या मिरच्या बारीक चिरून, एक चमचा लिंबाचा रस एक लहान चमचा साखर दोन चमचे पाणी

कृती: वर्याचे तांदूळ पिठ , शाबूदाणा पिठ साखर, चमचा मिरची पेस्ट, चमचा आले पेस्ट, लिंबाचा रस, चमचा तेल, चवीपुरते मिठ हे सर्व साहित्य एकत्र करावे. त्यात एक ते सव्वा कप ताक घालावे. वरील मिश्रण तयार झाले कि मिश्रणाचे दोन वेगवेगळे भाग करावे व वेगवेगळ्या भांड्यत ठेवावे.
एक भाग मिश्रणात एक टिस्पून इनो घालून पटापट एकाच दिशेने अंदाजे पंधरा सेकंद ढवळावे. मिश्रण थोडे फसफसायला लागते. लगेच कूकर गैसवर ठेउन कूकरच्याच एक छोट्या भांड्याला तेलाचा हात लाउन त्यात तयार पीठ ओतावे. मध्यम आचेवर पंधरा ते विस मिनीटे वाफ काढावी. शिट्टी लाउ नये.
जोवर ढोकळा तयार होतोय तोवर फोडणी तयार करू घ्यावी. लहानश्या लोखंडी पळीत दोन चमचे तेल गरम करावे. त्यात जिरे, बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या घालून फोडणी तयार करावी. फोडणी किंचीत कोमट होवू द्यावी. एका वाटीत दोन चमचे पाणी, एक चमचा लिंबाचा रस, एक लहान चमचा साखर यांचे मिश्रण तयार करावे. हे मिश्रण फोडणीत घालावे. पंधरा ते विस मिनीटांनी गॅस बंद करावा. थोड़े थांबुन एक दोन मिनीटांनी भांडे बाहेर काढावे. ढोकळा जरा गार झाला कि चाकुने कापून घ्यावा. त्यावर तयार केलेली फोडणी चमच्याने पसरावी. ढोकळयाच्या मिश्रणाचा उरलेला भागही वरील प्रमाणेच वाफवून घ्यावा. अवश्य करुन पहा- खुप छान स्पॊंजी होतो.

सौ. निवेदीता वाळिंबे

## उपवासाची धिरडी

साहित्यः- २ वाट्या व-याचे तांदुळ, १वाटी साबुदाणा,१वाटी शिंगाड्याचे पीठ, चवीनुसार मीठ,

चटणीसाठी साहित्यः- १ वाटी खोवलेला नारळ. १/२ हिरव्या मिरच्या, १/२ वाटी चिरलेली कोथिंबीर, चवीनुसार मीठ आणि साखर, १/२ लिंबाचा रस.

कृतीः- वर्याचे तांदुळ आणि साबुदाणा ३/४ तास भिजत घालावेत. नंतर त्यातील पाणी काढुन टाकुन मिक्सर मधुन वाटुन घ्यावे.वाटलेले व-याचे तांदुळ, वाटलेला साबुदाणा, शिंगाड्याचे पीठ , मीठ एकत्र करुन ३/४ तास झाकुन ठेवावे. नंतर गॅसवर निर्लेपचा तवा गरम करुन त्यावर १ वाटी पीठ घालुन वाटिने ते एकसारखे पसरावे. वरुन १चमचा तुप घालुन भाजुन घ्यावे. नारळाच्या चटणी बरोबर खायला द्यावे.

## वऱ्याच्या तांदळाच्या खांडविच्या वड्या

साहित्यः-१वाटी व-याचे तांदुळ, ११/४ वाटी गुळ,१/२ वाटी खोवलेल खोबरं, ५/६ वेलदोडे, १ टेबलस्पुन तुप.

कृतीः- वर्याचे तांदुळ तुपावर तांबुस भाजुन घ्यावेत. वेलदोडे सोलुन त्याचि पावडर करुन घ्यावी. दोन वाट्या पाण्यात गुळ व चवीपुरते मीठ घालुन पाणी उकळुन घ्यावे. पाणी उकळल्यावर त्यात वेलदोड्याची पुड आणि भाजलेले तांदुळ घालावे आणि झा-याने ढवळुन मंद आचेवर मऊ शिजवुन घ्यावे. एका ताटाला तुप लावुन त्यावर तयार झालेला सांजा काढुन एकसारखा थापुन घ्यावा.त्यावर खोबरे घालुन नंतर वड्या कापुन घ्याव्यात. खांडवी तयार.

सौ. ज्योती पळसुले...

## उपासाचे सामोसे------------

साहित्य--------शिंगाडा पीठ २५० ग्राम,मिरचीचा ठेचा २ चमचे,दाण्याचे कूट अर्धी वाटी,साबुदाण्याचे पीठ ३ चमचे,दही पीठ घट्ट होईल एव्हढे,चिरलेली कोथिंबीर थोडीशी,खवलेले खोबरे एक वाटी,उकडलेला बटाटा एक -----मोठा,मीठ आणि साखर चवीपुरते------जिरे,तळणीसाठी तूप.

कृती====प्रथम शिंगाड्याचे आणि साबुदाण्याचे पीठ एकत्र करून त्यामध्ये एक चमचा तुपाचे मोहन घालावे,मीठ व जिरे घालून ,मग दही मिसळावे. आणि पाण्याचा हात लावून चांगले मळावे.मग तो गोळा आर्धा तास झाकून ठेवावा.
सारण=====उकडलेल्या बटाट्यात खवलेले खोबरे,मीठ,साखर,मिरच्याचा ठेचा मिसळून चांगले एक जीव करावे,या सारणात एक चिमुट साखर घातली तरी चांगली लागते,
मग शिंगाडा आणि साबुदाणा पिठाच्या छोट्या गोळ्या करून हाताने पसरट आकार द्यावा,किवा साबुदाणा पिठाचा हात लावून पारी लाटावी.त्यामध्ये तयार केलेले सारण घालून हातानेच त्रिकोणी - आकार द्यावा,कडकडीत तुपात सोनेरी रंगात तळून दाण्याच्या कुटाची चटणी,किवा चिंचेच्या चटणी-सोबत खावे.

साधना गोखले------------

# फ़ोटोग्राफ़ी












तुकाराम महाराजांच्या पालखीचे अन वारीचे फ़ोटो तसेच वारकऱ्यांची पंगत – सर्व फ़ोटो टिपलेत गौरव देव याने








फ़ोटोग्राफ़ी - दीपक माने

# संगीत

# मैफल

" अगा वैकुंठीच्या राया....."

भीमसेनी स्वर मंडपात घुमले आणि सवाई गंधर्व महोत्सवाचा मंडप एकदम चित्रासारखा स्तब्ध झाला. जवळ जवळ १२००० श्रोते पुतळ्यासारखे बसून कानात प्राण आणून ऐकत होते. भान विसरले होते. तसे पंडीतजींनी पहीला “सा” लावला तेंव्हाच मंडपात “पिन ड्रॉप” शांतता पसरली होती. पंडीतजींच्या त्या सुरात ताकदच इतकी जबरदस्त होती की मंडपाबाहेर चहाच्या स्टॉलवरची वेळ घालवणारी, रेंगाळणारी मंडळीही लहान मुलांच्या "स्टॅच्यू"च्या खेळासारखी, आहेत तशी आणि आहेत तिथे स्तब्ध झाली. भीमसेनजी भान हरपून गात होते आणि श्रोतेही तितकेच भान विसरून ऐकत होते.



मी नेहमी जे माझ्या मित्रांना म्हणत आलोय आणि अजूनही म्हणतो त्याचा प्रत्यय आला, की भीमसेनांचे सर्वोत्कृष्ट गाणे ऐकायचे असेल तर फक्त सवाई गंधर्व महोत्सवामधले गाणे ऐकावे. मला वाटते की त्याचे कारण असे असावे की ते श्रोत्यांच्या टाळ्यांसाठीचे, "वन्समोअर"चे गाणे नव्हते, तर ती गुरुंना वाहिलेली श्रद्धांजली होती. ती तिकीट लावून केलेली लक्ष्मी क्रीडा मंदीर किंवा टिळक स्मारक मधली मैफल नव्हती, तर ती गुरूची सेवा होती.

या महोत्सवाला नुसते प्रसिद्धीचे वलय नसते तर यातील वातावरण भारीत असते. निराळेच असते. मुंबईचे गुणिदास संमेलन घ्या, ग्वाल्हेरचा तानसेन महोत्सव असो, दिल्लीच्या इंडिया गेटवरचा कार्यक्रम घ्या, किंवा कलकत्त्याचा आय.टी.सी. महोत्सव घ्या, सवाईचे भारीत वातावरण तिथे नसते. आणि म्हणून बडे बडे कलाकार इथे येण्यात बहुमान समजतात. उत्सुक असतात. पंडितजींच्या आमंत्रणाची वाट बघत असतात. मानधनाचा विचार न करता केवळ पंडितजींच्या शब्दासाठी येणारे कलाकार आहेत. वसंतराव देशपांडे तर घरचे कार्य असल्यासारखे सवाईत वावरत असत. या वातावरणातल्या प्रसन्नपणाची एक मजेदार गोष्ट सांगतो. त्यावेळी कार्यक्रम रेणूका स्वरूप शाळेच्या पटांगणावर होत असे. प्रत्येक रात्री श्रोत्यांवर संपूर्ण मंडपभर गुलाब पाण्याचा फवारा उडवला जात असे. १९९८ साली पंडितजींना अपघात झाल्याने त्या जानेवारीत झालेल्या महोत्सवात व त्यानंतर त्यांचा महोत्सवातला प्रत्यक्ष सहभाग कमी झाला आणि तेंव्हापासून सवाईचे वलय कमी होऊ लागले. महोत्सवाची रया, दिमाख गेला तो गेलाच. अर्थात नंतर ते महोत्सवात थोडा वेळ येऊन जात असत, तसेच २००२, २००३, २००४, २००६ साली थोडेसे गायलेसुद्धा. तिथे गायनापेक्षा आण्णा गायले याचे भावनिक महत्व अधिक होते. म्हणून आण्णांच्या भक्तांना, ज्यांनी आण्णांचे ऐन भरातले गाणे ऐकले आहे त्यांना ती त्यांची अवस्था पाहून अत्यंत वाईट वाटले असणार यात शंकाच नाही.

वसंतराव आणि पु. ल. देशपांडे यांची मैत्री तर सर्वश्रुत आहे. १९७० किंवा १९७१ चा सुमार असावा. नक्की सन आठबत नाही. सवाई गंधर्व महोत्सवाच्या काळात पु. ल. यांचे "बटाट्याची चाळ" आणि "असा मी असामी" चे पुण्यात प्रयोग होते. रात्रीचा प्रयोग झाला की पु. ल. सवाईच्या मंडपात येऊन बसत असत. महोत्सवाचा शेवटचा दिवस होता. शेवटी भीमसेनांचे गाणे आणि त्या आधी वसंतराव. त्यादिवशी पु. ल. वसंतरावांना हार्मोनियमच्या साथीला बसले. दीड तास वसंतराव अफाट गायले. नंतर भीमसेनांचे गाणे होते. पु. ल. मुकाट्याने उठून प्रेक्षकात जाऊन बसले. भीमसेन स्वरमंचावर आले. इकडे तिकडे पाहिले. प्रेक्षकात पु. ल. दिसल्यावर, भीमसेन स्वरमंचावरून खाली आले, पु. लं चा हात धरून त्याना सन्मानाने स्वरमंचावर घेऊन आले आणि हार्मोनियमवर साथ करण्याची विनंती केली.




**सवाई गंधर्व पुण्यतिथी कार्यक्रमात - साथ तबला - चंद्रकांत कामत,**
**संवादिनी - पु. ल. देशपांडे, मागे वसंतराव देशपांडे**

नंतर भीमसेनांचे जवळ जवळ पावणे दोन तास अफलातून गाणे. गाणे संपल्यावर छप्पर फाटेल असा टाळ्यांचा झालेला कडकडाट आजही माझ्या कानात घुमतो आहे. भीमसेन या महोत्सवाचा प्राण आहेत. खरेतर भीमसेन हे भारतीय संगीताचा प्राण आहेत. मी १९६१-६२ च्या सुमाराला गाणे ऐकायला सुरूवात केली. मी तेंव्हा मुंबईत राहत होतो. वडिलांच्या आग्रहावरून विलेपार्ल्याला लोकमान्य सेवा संघात भीमसेनांची मैफल प्रथमच ऐकली. आणि त्यावेळीही शास्त्रिय संगीतातले शून्य कळण्याच्या काळात जे ऐकले ते भन्नाट वाटले. आजही काही कळतय आहे असे नाही. त्यावेळी जितके कळत होते, किंबहुना जितके कळत नव्हते, तितकेच आजही कळत नाहीये. पण तेंव्हा एक गोष्ट लक्षात आली होती ती ही की, मंत्रमुग्ध होण्यासाठी संगीत कळण्याची जरूरी नाही. आणि हे माझे मत आजही कायम आहे. यमन कल्याण किंवा तोडीचा आनंद घेण्यासाठी, हंसध्वनी किंवा शुद्ध कल्याणसारख्या मन प्रसन्न करणाऱ्या मैफलीचा आनंद घेण्यासाठी त्या रागाची सरगम किंवा स्वरमांडणी माहित असण्याची गरज नाही. उत्कृष्ट श्रीखंडाचा आस्वाद, आनंद, हा चक्क्यातले "फॅट" % कळले तरच घेता येतो का? नाही. " वा वा. श्रीखंड फारच मस्त झालय" असं आपण म्हणतो. पण त्याचबरोबर " चक्क्यात फॅट % किती आहे हो?" असे विचारत नाही. श्रीखंड खाण्याने मिळणारा आनंद पुरेसा असतो. तसे आहे हे. आणि मग माझी संगीत ऐकायची भूक वाढत गेली तसतसे इतर कलाकारही ऐकायला लागलो. त्यात वसंतराव देशपांडे हा अवलिया कलाकार भरभरून ऐकला.



वसंतराव हे एक अजब रसायन आहे. ख्याल, नाट्यसंगीत, ठुमरी, दादरा, गझल, भावगीत, सिनेसंगीत वगैरे सर्व क्षेत्रात मुक्तपणे आणि तितक्याच समर्थपणे संचार करणारे हे कलंदर व्यक्तिमत्व. वसंतराव खरे " कट्यार..." मुळे नावारूपाला आले आणि लोकप्रिय झाले. इतके दिवस फक्त गायक म्हणून श्रोत्यांना ठाऊक असलेले वसंतराव, नट म्हणून प्रेक्षकांपुढे "कट्यार काळजात घुसली" मधून आले. आणि प्रचंड गाजले. त्यांचे "कट्यार ...." लोकानी डोक्यावर घेतले. पण तरीही वसंतरावांच्या अफाट कर्तृत्वाला योग्य ती प्रसिद्धी मिळाली नाही. म्हणून मी त्यांना "शापित गंधर्व" म्हणतो. बडी बडी टीकाकार म्हणवणारी मंडळी या सिद्धहस्त कलाकाराला गायक मानायला तयार नव्हती. इतकच काय तर आकाशवाणीनेही त्याना गायक म्हणून मान्यता दिली नाही. पुणे आकाशवाणीतल्या एका निवृत्त अधिकाऱ्यांना भेटायचा योग आला होता. ते आकाशवाणीचे "राजापेक्षा राजनिष्ठ" नोकर होते. वसंतरावांचा विषय निघाला. वसंतरावाना आकाशवाणीने मान्यता का दिली नाही असे विचारता त्यांचा चेहेरा एरंडेल प्यायल्यासारखा झाला. तेंव्हाच त्यांची आकाशवाणीवरची "राजनिष्ठा" लक्षात आली. त्यानी अंगावरून झुरळ झटकावे तसा तो विषय झटकून टाकला. फक्त इतकेच गुळमुळीत उत्तर दिले की त्यांचे स्वर शुद्ध नव्हते. गाणे तुटक तुटक असे. मी त्यावर म्हणालो की "मग कुमारजी सुद्धा तुटक तुटकच गातात की". पण त्या गृहस्थांना, ते निवृत्त का होईना पण सरकारी सेवक असल्याने माझे म्हणणे आवडले नाही. त्यांच्याकडे त्याचे समाधानकारक उत्तर नव्हते. राजनिष्ठ नोकर असल्याने आकाशवाणी म्हणते ते बरोबरच असले पाहिजे इतकेच त्यांना ठाउक होते. म्हणून मग त्यांनी "कुमार गंधर्वांची गोष्ट वेगळी आहे. त्याना एकच फुफ्फुस आहे. म्हणून त्यांचे असे होते." वगैरे थातुर माथुर म्हणून वेळ मारून नेण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. आणि मीसुद्धा "हो का? असेल असेल" असे म्हणून उगाच न संपणारा वाद नको, म्हणून तिथून काढता पाय घेतला.

पंडीत जसराजही खूप ऐकले आहेत. जसराजांचा आवाज अतिशय मुलायम. अंगावरून मोरपिस फिरवल्यासारखे वाटावे असा. श्रोत्यांना बांधून ठेवण्याची जबर शक्ती त्या आवाजात आहे. मला आठवतय कि १९७४/७५चा सुमार असावा. सन नक्की आता आठवत नाही. पंडीतजी काही वर्षाच्या अनुपस्थितीनंतर सवाईत गात होते. नुकतेच जीवघेण्या दुखण्यातून बाहेर आले होते. त्यावर्षी ते अफाट गायले. मला वाटते ते "दरबारी" गायले होते. द्रुतची बंदिश "अजब तेरी दुनिया मालिक" संपवली आणि प्रेक्षकांनी उभे राहून टाळ्यांचा कडकडाट केला. आणि त्यानंतर जसराज आणि सवाई गंधर्व महोत्सव हे समीकरण बनले. जोग, गोरख कल्याण, अहिर भैरव, नट भैरव, भैरव, जयजयवंती. आणि गेल्या वर्षी तर शुद्ध सारंग. किती किती मैफली. त्यात झाकिर तबल्याच्या साथीला असेल तर मग जसराज अधिकच खुलायचे.

मी गाणे ऐकायला सुरूवात केल्यानंतरच्या काळात म्हणजे १९६० ते १९८५ या दोन तपात भारतिय शास्त्रिय संगीतावर भीमसेन, जसराज, कुमार गंधर्व आणि वसंतराव देशपांडे या चार महान कलाकारांचा जबरदस्त प्रभाव होता. किशोरी आमोणकर, मालिनी राजूरकर, बेगम परवीन सुलताना, उस्ताद अमीरखानसाहेब ही महान मंडळी होती. उ. सलामत अलीखान नझाकत अली खान हेही त्या काळात लोकप्रिय होते. पण त्यांचे कार्यक्षेत्र पाकिस्तानात होतं. रवी शंकर, विलायत खान, हरीप्रसाद चौरासिया, शिवकुमार शर्मा वगैरे वाद्य संगीत-दिग्गज मंडळी होती. यांचे महत्व अजीबात कमी होत नाही. पण ही सर्व भारताबाहेर जास्त रमत असत. परदेशात हे कलाकार भारतापेक्षा अधिक लोकप्रिय होते. पण भीमसेन, वसंतराव, जसराज, आणि कुमारजी हा भारतीय संगीताचा प्राण होता असे मला वाटते. चौखांबी तंबू होता जणूकाही. मी म्हणतो त्या काळात या चौघांनी शास्त्रिय संगीताची धुरा समर्थपणे आपल्या खांद्यावर वाहीली होती.

मला असे वाटते की भीमसेनांचे व्यक्तिमत्व आणि गाणे हे एखाद्या कुटुंबप्रमुखासारखे आहे. सर्व कुटुंबाला दिशादर्शक, मार्गदर्शक, आणि कडक शिस्तीचे. सर्वांना संभाळून घेणारे. प्रसंगी कुटुंबप्रमुखाप्रमाणे कानपिचक्याही देणारे.

शिस्तीच्यासंदर्भात पंडितजींचा एक मजेदार किस्सा आठवला. मुंबईत एक कार्यक्रम होता. एक मोठे मंत्री दर्जाचे नेते येणार होते. मंत्रीजींना नेहमीप्रमाणे पाऊण तास उशिर झाला. त्यानंतर संयोजकांचे तासभर भाषण झाले. त्या भाषणात त्यांनी पंडितजींचा "आजचे प्रमुख कलाकार पं भीमसेन जोशी आहेत." इतकाच उल्लेख केला. बाकी सर्व मंत्रीस्तुती होती. पंडितजींना फक्त २० मिनिटे दिली होती. पंडितजी बरोबर २० मिनिटे गायले. अफाट गायले. त्यानंतर प्रेक्षकांनी आरडा ओरडा केला की अजून गा. पंडितजी जाग्यावरून उठले आहीत. मग मंत्रीजी जाग्यावरून उठले. पंडितजींच्याकडे गेले. त्यांना नमस्कार केला आणि म्हणाले की, "सर्व प्रेक्षकांची इच्छा आणि आग्रह आहे तरी आपण अजून गावे." पंडितजींनी काय केले असेल? पंडितजींनी आपले घड्याळ मंत्रीजींना दाखवले आणि म्हणाले, "मला २० मिनिटांचा वेळ दिला गेला होता. त्याप्रमाणे गायलो. वेळेची बंधने ही पाळली जावीत असे मला वाटते. आता आणखी गाणे योग्य होणार नाही." असे म्हणून त्यांनी नम्रपणे नकार दिला. आणि ते गायले नाहित. पंडितजींनी आपल्या गाण्यात फारसे धाडसी प्रयोग केले नाहीत. "धोपट मार्गा सोडू नको" असे त्यांचे गाणे असे. त्यांना कधीतरी विचारले गेले होते की तुम्ही तेच तेच राग मैफलीत का सादर करता? तेंव्हा त्यांनी उत्तर दिले होते की श्रोते मला काय येतय हे पहायला येत नाहीत. माझ्या गाण्याचा आनंद घेण्यासाठी येतात. श्रोत्यांना आनंद देणे महत्त्वाचे. त्यामुळे त्यांना समजेल, आवडेल असे मी गातो.

त्या उलट वसंतरावांचे गाणे आक्रमक. साहसी. त्यांच्या गळ्यातून अश्या काही मुश्किल स्वरावली बाहेर पडत असत, आणि या जागा ते इतक्या सहजतेने घेत असत कि ऐकणारे चकित होउन जात. वसंतरावांचे व्यक्तिमत्व किंचितसे खोडकर. किंवा शाळेतल्या अतिशय हुशार पण व्रात्य मुलासारखे. जाता जाता टपली मारणारे. खोड्या काढणारे. त्यांच्या गाण्यात आव्हान असे कि "पहा मी किती सहज गातोय ते. तुम्हाला येइल का असे?" किंवा हुशार मुलगा म्हणतो ना की " अरे इतके सोपे गणित येत नाही? पहा कसे सोडवायचे ते." भीमसेनांचे गाणे हे कसोटी क्रिकेट सारखे आहे, तर वसंतरावांचे गाणे हे एकदिवसिय सामन्यासारखे आहे. त्या सामन्याचा जीव फक्त ५० षटकांचा. पण तरीही त्यात क्रिकेटचे तंत्र आत्मसात नसले तर खेळाडू अपयशी ठरेल. तसे वसंतरावांची मैफल ही दीर्घ नसली तरीही तांत्रिकदृष्ट्या अतिशय परीपूर्ण असते. ताना अणि सरगम हे वसंतरावांचे बलस्थान. आणि म्हणूनच वसंतरावांच्या ताना आणि सरगम ही श्रोत्यांना नागाप्रमाणे डोलवत असे. पण वसंतराव फारसे ख्याल गायनात रमत नसत. त्यांचा ख्याल हा जेमतेम ३५ ते ४० मिनिटांचा असे.


ते नाट्यगीते, ठुमरी, दादरा, भावगीत अश्या उपशास्त्रिय प्रकारात अधिक खुलायचे. मला या संदर्भात त्यांची न्यूयॉर्कमधली एक मैफल आठवतीये. मी हजर नसलो तरी माझ्याकडे ध्वनिमुद्रण आहे. त्यात वसंतराव जेमतेम अर्धातास "भीमपलास" गायले आहेत. नंतर श्रोत्यानी आग्रह केला "नाट्यगीत म्हणा". त्यावर ते नेहमीच्या त्यांच्या अनुनासिक आवाजात म्हणाले, "नाट्यगीतेच म्हणायची आहेत ना? म्हणतो. पण त्याआधी मी तुम्हाला आमच्या संगीत नाटकाबद्दल सांगितले तर चालेल का?" "हो हो. चालेल चालेल." "तुम्हाला आमच्या नाटकातले संगित कसे असते ते सांगतो व त्याची झलक दाखवतो. आणि मग जसा वेळ असेल तशी काही नाट्यगीते म्हणतो. चालेल?" "हो. चालेल चालेल." " ठीक आहे. मी यासाठी पांच प्रमुख संगित नाटके आधार म्हणून घेणार आहे. की जी मराठी संगित नाटकाचा प्राण समजला जातात. सौभद्र, मानापमान, शाकुंतल, शारदा आणि मृच्छकटिक. ही ती पांच नाटके." आणि असे म्हणून त्यानंतर वसंतराव तासभर गाण्यासह बोलले आहेत. इथे एक उल्लेख जाताजाता करायचा आहे तो असा कि, पु. ल. देशपांडे आणि व. पु. काळे या दोघांनी वसंतरावांच्या स्वतंत्र मुलाखती घेतलेल्या आहेत. मुलाखतकाराने कमीतकमी बोलून कलाकाराला अधिकाधिक कसे बोलू द्यायचे असते याचा या मुलाखती म्हणजे आदर्श वस्तुपाठ आहेत. यापैकी वपुंनी घेतलेली मुलाखत ही आलुरकरांनी "मराठी संगीत नाटकाची वाटचाल" या नावाने दोन भागात प्रसिद्ध केलेली आहे. वसंतप्रेमींनी ही मुलाखत जरूर ऐकावी.

कुमार गंधर्वांचे गाणे हा वेगळाच विषय आहे. त्यांचे गाणे हे कानाला अतिशय गोड, सुरेल लागते. पण गूढ. जी.ए. कुलकर्णींच्या गोष्टींसारखे. फ्रेंच भाषा समजत नाही पण ऐकायला गोड. समजायला अतिशय कठिण तसे.



अफाट प्रतिभासंपन्न गाणे. अतिशय सुबक मांडणी. आपल्याला काय सादर करायचे आहे याचा मुद्देसूद आराखडा डोक्यात तयार असावा असे सादरीकरण. त्यांची निर्गुणी भजने लोकांनी डोक्यावर घेतली. त्यांनी काही रागांची निर्मितीही केली आहे. त्यांचे "अनुपरागविलास" हे पुस्तक अतिशय प्रसिद्ध आहे. त्यात त्यांनी निर्माण केलेल्या रागांबद्दल तांत्रिक माहिती आणि त्या रागातल्या चीजा त्यांनी दिल्या आहेत. शास्त्रिय संगिताचा अभ्यास करणाऱ्यांनी हे पुस्तक जरूर अभ्यासावे. पण त्यांच्या गाण्यावर त्यांच्या साथ न देणाऱ्या प्रकृतीचे सावट होते. त्यांच्या ताना थोड्याश्या तुटक तुटक असायच्या. पण असामान्य प्रतिभेच्या जोरावार त्यांनी या त्रुटींवर समर्थपणे मात केली. इतकी कि या गोष्टी, त्यांचे गाणे ऐकताना लक्षातही येत नसत. त्यांचा अतिशय गोड स्वर कानावर पडला की श्रोते भान विसरत असत. गाणे ऐकण्याच्या सुरूवातीच्या काळात त्यांचे गाणे मी ऐकले तेंव्हा मला त्यांचे गाणे शाळेच्या हेडमास्तरसारखे वाटायचे. मुलांना हेडमास्तरांची नेहमी भीति वाटते. पण त्याचबरोबर शिस्त आणि बुद्धिमत्तेचा आदरही असतो. तसे कुमारांचे गाणे ऐकताना मला वाटायचे.

आणि जसराजजींच्या गाण्याबद्दल काय बोलायचे? मी मगाशी म्हटल्याप्रमाणे त्यांचे गाणे अंगावर मोरपीस फिरवल्यासारखे. अतिशय सुरेल व गोड गळा. तितकेच प्रसन्न व्यक्तीमत्व. गातानाच्या त्यांच्या भावमुद्रा अतिशय लोभसवाण्या असत. वसंतरावांप्रमाणे सुंदर ताना. आणि हातखंडा सरगम. त्यांच्यावर काही जणांचा असा आक्षेप असे की ते फार ठाय लयीत गातात.



त्यामुळे त्यांचे गाणे खूप संथ आहे. मला कळत नसल्यामुळे, हे मला फारसे मान्य नाही. माझ्यासारख्या अस्सल कानसेनाला ते गाणे ऐकताना असे वाटते कि त्यावेळी त्या ठाय लयीची गरजच आहे. रागाचा शास्त्राशुद्ध विस्तार, रंजक मांडणी आणि श्रोत्यांना गुंगवून ठेवण्याचे कसब ही त्यांची वैशिष्ट्ये. त्यांचे दुसरे मला जाणवलेले वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या रागातल्या बंदिशींचे बोल हे यावनी नसतात. हिंदू देवतांच्या स्तुतीपर बोल असतात. मला माहित असलेला अपवाद म्हणजे त्यांची भैरव रागामधली "मेरो अल्ला मेहेबान" ही बंदिश आणि तोडी रागामधली "अल्ला जाने अल्ला जाने" ही बंदिश. इतर असतील तर निदान मला तरी माहित नाहियेत. पण माझ्या अल्प ज्ञानाप्रमाणे यावनी बंदिशी नाहित. जर असतील तर कृपया जाणकारांनी माझ्या ज्ञानात भर घालावी ही विनंती. जसराजांचे गाणे कधीही आक्रमक वाटलेच नाही. मला ते नेहमी आईच्या मायेसारखे वाटत आले आहे. आपण दुःखात असलो की आईने पदराखाली घेतल्यावर जशी मनाला शांतता मिळते तसे, मला त्यांची मैफल ऐकत असताना आपल्याला आईने पदराखाली घेतले आहे असे मला सारखे वाटायचे. गेल्या काही महिन्यांपूर्वी हा मला अनुभव आला. माझ्यावर माझी प्रिय व्यक्ती सोडून देवाघरी जाण्याचा दुःखद प्रसंग ओढवला. त्यावेळी असाच सकाळी फिरायला गेलो असता पंडितजींचा एक नितांतसुंदर भैरव ऐकत होतो. हुबळीतली मैफल होती. ५० मिनिटांच्या त्या मैफलीत हा मला अनुभाव आला. मी पूर्णपणे स्वतःला विसरून गेलो. मी कुठे आहे, काही मला काही आठवत नाही इतका मी ब्लँक झालो होतो. म़ाझे सर्व दुःख तेव्हढ्यापुरते तरी पूर्णपणे मी विसरलो. वास्तविक भैरव हा तसा उग्र प्रकृतीचा, प्रवृत्तीचा राग. इतका उग्र राग हा इतका मुलायम होऊ शकतो यावर इतके दिवस माझा विश्वास नव्हता. त्यादिवशी तो बसला. आणि ही पंडितजींच्या मधुर रेशमी आवाजाची करामत होती.

तर असे हे चार प्राण. पांचवा प्राण अर्थात श्रोते. भारतीय शस्त्रिय संगीत या चौघांशिवय अपुरे आहे. इतरही खूप कलाकार आहेत. त्यात प्रामुख्याने नाव घ्यायचे म्हणजे मालीनीताई राजूरकर, बेगम परवीन सुलताना, उ. रशिदखाँ, उ. अमीरखाँसाहेब, पंडित राजन साजन मिश्रा, पंडित जितेंद्र अभिषेकी, प्रभाकर कारेकर, किशोरताई आमोणकर, अजय चक्रवर्ती, गुंदेचा बंधू, वीणाताई सहस्रबुद्धे, आरती अंकलीकर. ही सारी दिग्गज मंडळी आहेत. पण या सर्वात सध्या आपल्या गाण्याने श्रोत्यांवर मोहिनी घातली आहे ती अजयजींची बुद्धीवान कन्या कौशिकी चक्रवर्ती. अफाट तयारी, अतिशय सुरेल आवाज, ताल आणि सरगम वर प्रचंड प्रभुत्व या जोरावर ती खूपच लोकप्रिय झाली आहे. तिची मैफल ऐकणे हा एक प्रचंड आनंददायी आणि सुखद अनुभव आहे. विशेषतः तिचा "सुंदर ते ध्यान..." हा अभंग तर खास लोकप्रिय आहे. हा अभंग गाताना ती अमराठी आहे, तिला मराठीचा गंध शून्य आहे हे जाणवतही नाही.

असेच अनेक तरूण कलाकार आहेत की जे बऱ्याच जणांना ठाऊकही नाहीत. पण अफाट गुणवत्ता त्यांच्याकडे आहे. मी ऐकलेल्या काही कलाकारांपैकी गोव्याची आरती नायक ही सुरेल गायिका. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची संगित अलंकार (एम.ए.) ही पदवी तसेच "सूरसिंगार संसद"च्या सूरमणी पुरस्काराने सन्मानीत,



आचरेकर सांस्कृतीक प्रतिष्ठानचा "वामनदाजी" पुरस्कार. अशी ही गुणी कलाकार. अत्यंत सुरेल आवाज, अफाट तयारी, ख्यालाची नेटकी आणि सुबक मांडणी नीटस सादरीकरण ही तिच्या गायनाची प्रमुख वैशिष्ट्ये. तिची मैफल ऐकणे हा एक निखळ आनंददायी अनुभव आहे. नाव न सांगता हिचे गाणे ऐकले तर आपण एखाद्या दिग्गज कलाकाराचे गाणे ऐकतोय असे वाटावे. हेमा उपासनी ही मी ऐकलेली आणखी एक तरूण कलाकार. सवाई गंधर्वमधले तिचे गाणे खूपच छान झाले होते. इंदूरच्या डॉ. आभा-विभा चौरसिया भगीनींचा इथे आवर्जून उल्लेख करतो तो अशासाठी की माझ्या माहीतीप्रमाणे स्त्री गायिकांची नियमीत सहगायनाच्या मैफ़ली करणारी हिराबाई बडोदेकर-सरस्वती राणे या जोडीनंतरची ही एकमेव जोडी आहे. आणखी कोणी असल्यास मलातरी माहीत नाहीये.
कुठल्याही मैफलीचा शेवट हा नेहमी भैरवीने होतो. भैरवी हा हुरहूर लावणारा राग आहे. मैफ़लीचा शेवट करण्यापुरतंच याचं सादरीकरण होत असलं आणि भैरवीत जरी गाणे संपल्याची आर्त जाणिव असली तरी अजय चक्रवर्ती मैफ़लीत हा पूर्ण लांबीचा राग बऱ्याच वेळा गातात. भीमसेनांची "बाबुल मोरा..." असो किंवा " हरीका भेद न पाये..." असो, वसंतरावांचे "ना मारो पिचकारी..." असो ही सर्व हुरहूर लावतात. लावतात. जसराजांचे "निरंजनी नारायणी..." आणि "माई सावरे रंगराची..."तर अतिशय आनंद-भैरवी आहेत. पण मैफलीची सांगता भैरवीने करायची नाही ही गोष्ट सहसा आढळत नाही. पण गेल्या महिन्यात कौशिकीची पुण्यातली मैफल मात्र भैरवीशिवाय संपली. लोकांना ती आणखी गाईल असे वाटतानाच तिने प्रेक्षकांना नमस्कार केला आणि रंगपटात निघूनही गेली. नंतर लोकाना कळले की मैफल संपलीये.
तर ही अशी मी सदर केलेली आठवणींची एक मैफल. यात लिहिलेली ही पूर्णतया माझी मते आहेत. सर्व रसिक माझ्या मताशी सहमत असतीलच असे नाही किंबहुना नसतीलच. असे जे रसिक माझ्या मताशी सहमत नसतील अश्या सर्व रसिकांच्या बहुमूल्य मतांचा मी आदर करतो. त्या रसिकांनी आपली मते अवश्य मांडावीत. हे माझे निवेदन हीच माझ्या लेखाची भैरवी आहे.

ॐ तत्सत

**श्रीराम पेंडसे**

# स्मार्ट सवंगडी

## आभा दाते इ. ३ मा.स.गोळवलकरगुरूजी विद्यालय, पुणे






ओजस अनिकेत समुद्र – वय ६ वर्षे














पार्थ व्यवहारे – ११ वर्षे

## विराज दीपक माने - वय वर्षे ९





